सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ८३ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## राहुल गांधींनी अमेरिकेत मांडला महाराष्ट्र निवडणुकीचा मुद्दा

### म्हणाले ‘सिस्टममध्ये मोठी गडबड, निवडणूक आयोगानेही तडजोड केली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१बोस्टन अमेरिका**

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी अमेरिका दौऱ्यावर आहेत. गांधी यांनी अमेरिकेतील बोस्टन शहरातील ब्राउन विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या एका सत्रामध्ये सहभाग घेतला. यावेळी त्यांनी संबोधित केले. यामध्ये त्यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका आणि निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी निवडणुकीत निवडणूक आयोगाने तडजोड केल्याचे ते म्हणाले.

खासदार राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्रातील वयस्करांपेक्षा जास्त लोकांनी निवडणुकीत मतदान केले. निवडणूक आयोगाने सायंकाळी ५.३० वाजता मतदानाची आकडेवारी जाहीर केली. सायंकाळी ५:३० ते ७:३० या वेळेत ६५ लाख मतदारांनी मतदान केले. पण हे शारीरिकदृष्ट्या शक्य नाही.

’एक मत देण्यासाठी सुमारे ३ मिनिटे लागतात. जर तुम्ही थोडे गणित केले तर याचा अर्थ असा की लोक पहाटे २ वाजेपर्यंत रांगेत उभे राहिले असते. पण तसे झाले नाही, असंही राहुल गांधी म्हणाले.

**निवडणूक आयोगावर आरोप**

यावेळ राहुल गांधी म्हणाले, ज्यावेळी आम्ही व्हिडिओग्राफी



चालू आहे का असे विचारले, त्यावेळी त्यांनी ते नाकारले. त्यांनी फक्त नाकारले नाही तर कायदाही बदलला. तुम्हाला आता व्हिडिओग्राफीबद्दल विचारण्याची परवानगी नाही, राहुल गांधी पुढे म्हणाले की, निवडणूक आयोगाने तडजोड केली आहे हे पूर्णपणे स्पष्ट आहे. व्यवस्थेत मोठी त्रुटी आहे. आम्ही हा मुद्दा अनेक वेळा माध्यमांद्वारे आणि इतर माध्यमांद्वारे सार्वजनिकरित्या उपस्थित केला आहे.

खासदार राहुल गांधी २० एप्रिल रोजी अमेरिका दौऱ्यावर गेले आहेत. येथे त्यांचे स्वागत इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी केले. पित्रोदा यांनी सोशल मिडिया एक्सवर एक पोस्ट केली. पित्रोदा यांनी लिहिले, राहुल गांधी, अमेरिकेत आपले स्वागत आहे! तरुणांचा, लोकशाहीचा आणि चांगल्या भविष्याचा आवाज. चला ऐकूया, शिकूया आणि एकत्र येऊन विकास करूया.

राहुल गांधी येथे एनआरआयच्या सदस्यांशी, पदाधिकारी आणि इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या सदस्यांशी संवाद साधण्याची शक्यता आहे. काँग्रेस नेते पवन खेरा यांनी राहुल गांधींच्या अमेरिका दौऱ्याची माहिती दिली.

**भाजपने निशाणा साधला**

दरम्यान, आता राहुल गांधींच्या या विधानावर भाजपाने निशाणा साधला आहे. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी राहुल गांधींच्या विधानावर निशाणा साधला. ते म्हणाले, ’भारतीय मतदारांचा विश्वास जिंकू न शकलेले लोकशाहीविरोधी, भारतविरोधी राहुल गांधी यांनी परदेशातील भारतीय लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायला सुरुवात केली आहे. राहुल नेहमीच परदेशात भारताची बदनामी का करतात? ’जॉर्ज सोरोसचा एजंट, भारतीय राज्याशी लढत आहे, राहुल गांधी आज तेच करू इच्छितात!’

## कर्जमाफीवर बोलण्यासाठी मुहूर्त काढायचा आहे का? बच्चू कडूंचा मुख्यमंत्र्यांना सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१पुणे**

निवडणुकीवेळी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, कोरा करू म्हणणारे मुख्यमंत्री आता मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर काहीच बोलत नाहीत. आम्ही मुख्यमंत्र्यांना शेतकरी कर्जमाफीवर बोला बोला, असे म्हणत



आहोत. मात्र, ते त्यावर बोलतच नाहीत. शेतकरी कर्जमाफीवर बोलण्यासाठी त्यांना कुठल्या ब्राह्मणाकडून मुहूर्त काढायचा आहे का? की त्यांनी बोलावे, यासाठी आम्हाला महापूजा ठेवावी लागेल? असा सवाल प्रहार संघटनेचे संस्थापक माजी आमदार बच्चू कडू यांनी उपस्थित केला.

राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने गंजपेठेतील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित केलेल्या युवा संघर्ष निर्धार परिषदेस कडू उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर उपस्थित होते. कडू म्हणाले, आमचा अजेंडा गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकऱ्यांचा आहे. आम्ही शेतकऱ्यांसाठी लढतो, जो शेतकरीविरोधी तो आमच्या विरोधी आहे. मग ते एकनाथ शिंदे असोत किंवा मुख्यमंत्री असोत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, म्हणून सांगणारे मुख्यमंत्री आता मात्र त्यावर काहीच बोलत नाहीत. त्यांची नेमकी अडचण काय आहे, माहिती नाही. त्यांचे गणित चुकले आहे का, हे कळत नाही.

## देवेंद्र फडणवीस म्हणाले- राज्यात कुठेही हिंदी लादली जात नाही

### भारतीय भाषेला विरोध करत इंग्रजीचे गोडवे गाणे, याचे वाईट वाटते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१पुणे**

महाराष्ट्रात सध्या मराठी आणि हिंदी भाषेचा वाद सुरू आहे. हिंदीच्या सक्तीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना पत्र देखील पाठवले आहे. या पत्रातून त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. यावर तोडगा काढण्याची देखील मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. या सगळ्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हिंदी भाषा कुठेही लादली जात नाहीये, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठीच्या ऐवजी हिंदीची सक्ती करण्यात आलेली नाही. तीन भाषा शिकणे अनिवार्य आहे. त्यातील दोन भारतीय भाषा असल्या पाहिजेत. आता आपल्याकडे दोन भाषा कोणत्या तर एक मराठी आहेच त्यासोबत आपण हिंदी भाषा



घेतली आहे. मल्याळम किंवा इतर अशा भाषा ठेवल्या तर त्याचे शिक्षक आपल्याकडे उपलब्ध नाहीत. तसेच कोणाला हिंदीच्या व्यतिरिक्त दुसरी भाषा शिकायची असेल तर आम्ही त्याची सोय करू. २० च्या वर विद्यार्थी असतील तर शिक्षक दिला जाईल, कमी असतील तर ऑनलाईन पद्धतीने भाषा शिकवली जाईल. पण हिंदी लादण्याचा प्रयत्न होत आहे, हे म्हणणे चुकीचे आहे. मला एका गोष्टीचे वाईट वाटते, आपण आपल्या देशाच्या हिंदी भाषेला विरोध करतो आणि इंग्रजी भाषेचे गोडवे गातो, अशी खंत देखील यावेळी बोलताना फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.


**जिथे पाण्याचे स्त्रोत स्वतंत्र नाहीत अशा ठिकाणी टंचाई जास्त**

तसेच महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये पाण्याच्या टंचाईचे संकट उभे राहिले आहे. यावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुळातच आपल्याला कल्पना आहे की एप्रिल आणि मे या दोन महिन्यांमध्ये राज्याच्या काही भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण होते. विशेषतः जिथे पाण्याचे स्त्रोत स्वतंत्र नाहीत अशा ठिकाणी ही टंचाई जास्त असते. आपण यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना प्राधिकृत करतो. जिल्हाधिकाऱ्यांनी पाण्याच्या टंचाईसंदर्भात मॅपिंग करून ज्या भागात टंचाई जास्त जाणवते तिथे वेगवेगळ्या स्त्रोततून पाणी गेले पाहिजे, ही व्यवस्था करायची असते. आताही आम्हाला काही तक्रारी मिळाल्या आहेत तर आम्ही त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवतो आणि टंचाई दूर करण्याचा प्रयत्न करतो.

## लॉकडाऊन एक फालतू निर्णय होता; व्हाईट हाऊसने कोरोनाची वेबसाईट बदलली, ट्रम्प अन् लॅब लीक..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१वाशिंग्टन**

कोरोनाचे संकट निवारून गेले आहे. चीनमधून सुरु झालेला हा व्हायरस हजारो लोकांचा बळी घेऊन शांत झाला आहे. भारतासह सर्वच लोकांनी लॉकडाऊन सुरु केला होता. परंतु, हा व्हायरस पसरण्यापासून काही रोखता आले नव्हते. लोकांनी सुरक्षित अंतर ठेवले, मास्क घातले, सॅनिटायझर वापरले, बरेच प्रयोग केले. रुग्णालयांतील बेड अपुरे पडत होते. औषधांचा तुटवडा जाणवत होता. डोलो सारख्या गोळ्या एवढ्या विकल्या गेल्या की एक विक्रम झाला होता. अशातच आता कोरोनामुळे सर्वाधिक दैना




उडालेल्या अमेरिकेने आता कोरोना काळात केलेला लॉकडाऊन एक फालतू निर्णय होता, असे म्हटले आहे.

सरकार बदलताच आता सरकारचे सूर बदलू लागले आहेत. चीनविरोधात अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आघाडी उघडली आहे. अशातच कोरोनाशी संबंधीत माहिती देणारी अधिकृत वेबसाईट कोविड डॉट गव्ह बदलण्यात आली आहे. या वेबसाईटवर जाताच एका नव्या वेबपेजवर रिडायरेक्ट केले जात आहे. या साईटवर आधी कोरोना लस, टेस्टिंग आणि उपचारासंबंधी माहिती दिली जात होती.

आता या वेबसाईटवर कोरोना व्हायरस चीनच्या लॅबमधून लीक झाला होता, असे येत आहे. कोरोनाच्या सुरुवातीला चीनच्या वुहान येथून कोरोना व्हायरस पसरल्याचे बोलले जात होते. तसेच एका लॅबमधून हा व्हायरस लीक झाल्याचा दावा करण्यात येत होता. चीनमधील एका संशोधक महिलेने हा दावा केला होता. यानंतर जगभरात खळबळ उडाली होती. बायोवॉरसाठी हे व्हायरस तयार केले जात होते, याद्वारे शत्रू देशात हाहाकार उडविला जाणार होता, असेही सांगितले जात होते. परंतु, आजवर या लॅब थेअरीबाबत शास्त्रियदृष्या कोणताही ठोस पुरावा मिळालेला नाही. अमेरिकेतील कोरोनासंबंधीच्या सर्व वेबसाईट आता या चीनविरोधी विषय असलेल्या वेबसाईटवर वळविण्यात येत आहे. कोविड चाचणी किट ऑर्डर करता येणारी लेौंीळवींर्शीी.सेीं ही वेबसाइट देखील तिकडेच वळविण्यात आली आहे. ट्रम्प आल्यापासून त्यांच्या अजेंड्यानुसार अनेक सरकारी वेबसाइटवरील मजकूर बदलण्यात आला आहे.

## मुंबईवरच्या ‘२६/११’ हल्ल्यात काँग्रेस अन् राष्ट्रवादीचा हात; भाजप नेत्याचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ मुंबई**

मुंबईवर झालेल्या हल्ल्यात (२६/११) काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा हात होता. स्थानिक प्रशासनावर प्रभाव असलेल्या व्यक्तीच्या सहभागाशिवाय एवढा मोठा हल्ला घडू शकत नाही. मुंबईवर हल्ला होणार याची सगळ्यांना कल्पना होती,’असं खळबळजनक वक्तव्य भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी केलं आहे. दाभोलकर, पानसरे, लंकेश आणि कलबुर्गी या हत्यासाखळीद्वारे हिंदुत्ववादी संघटना मोडीत काढण्याचं षड्यंत्र आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात निर्दोष सुटलेले विक्रम भावे यांच्या ‘दाभोलकर हत्या आणि मी’ या पुस्तकाचे प्रकाशन भांडारी यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. सनातन संस्थेचे अभय वर्तक, ड. संजीव पुनाळेकर आणि भावे उपस्थित होते. ‘सत्ता बदलली तरी पोलीस व्यवस्था बदललेली नाही.



दाभोलकर हत्या प्रकरणात शिक्षा झालेले शरद कळसकर आणि सचिन अंदुरे निर्दोष आहेत. त्यांची सुटका होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही. आमच्या कामाचा बारामतीच्या काकांना राग होता असा टोलाही त्यांनी लगवाल आहे.

फुले, शाहू, आंबेडकर यांचा महाराष्ट्र यापुढे पवारांचा महाराष्ट्र म्हणून ओळखला जाणार का? दाभोलकर हत्या प्रकरणाने हिंदुत्ववादी संघटनेचे कंबरडे मोडण्याचे काम केले,’ अशी टीका पुनाळेकर यांनी केली. ‘हिंदू दहशतवाद नाव देऊन विक्रम भावे यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यात आले. महाराष्ट्र अंनिसवर प्रशासक नेमून ती नक्षलवादी संघटना म्हणून जाहीर करा,’ अशी टीका वर्तक यांनी केली.

‘गुजरात दंगलीपासून हिंदुत्वाला बदनाम करण्याचं काम सुरू आहे. देशात राजकीय बदल झाला तरी केवळ तेवढ्याने भागत नाही. सरकार आपले असले तरी व्यवस्था आपली नाही. पोलिस, महसूल, न्यायव्यवस्था अशा सर्व क्षेत्रांत वेगळे लोक आहेत. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले म्हणजे आपण यशस्वी झालो, असं नाही. व्यवस्था बदलण्याचं मोठं आव्हान आहे,’ असे माधव भांडारी यावेळी म्हणाले.

## ठाकरे एकत्र येतील तेव्हा येतील, आंबेडकरी पक्षांचे ऐक्य आवश्यक

### रामदास आठवले यांची भूमिका : उद्धव–राज ठाकरे एकत्र आले तर महाविकास आघाडी तुटेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर**

राज्यभरात शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या एकत्रित येण्याबाबत विविध कयास वर्तविण्यात येत असताना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आंबेडकरी ऐक्याची भूमिका मांडली आहे. ठाकरे एकत्र येतील तेव्हा येतील, मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आंबेडकरी पक्षांचे ऐक्य आवश्यक आहे. त्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सकारात्मक पुढाकार घ्यावा असे आवाहन आठवले यांनी केले आहे.

देशात केवळ दोनच पक्ष असावेत अशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती. मात्र आंबेडकरी पक्ष जास्त काळ एकत्रित राहू शकले



नाहीत. आरपीआयमध्येदेखील फूट पडली व बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. मात्र आता आंबेडकरी ऐक्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत. प्रकाश आंबेडकर यांनी नेतृत्व स्वीकारले तर सर्व आंबेडकरी पक्ष एकत्रित येऊ शकतात. माझा त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहे. मात्र आंबेडकरांकडून अद्याप हवी तशी साथ मिळालेली नाही. स्वबळावरच लढण्याची त्यांची भूमिका आहे. त्यांनी खरे तर बाबासाहेबांच्या विचारातून समोर आलेला पक्षच चालविला पाहिजे, असे आठवले म्हणाले.

**तर महाविकासआघाडीतून उद्धव दूर होतील**

उद्धव ठाकरे व राज ठाकरे सोबत यावे अशी माझीदेखील इच्छा आहे. ते सोबत आले तर महाविकास आघाडीत निश्चित फूट पडेल. महाविकासआघाडी कधीही राज ठाकरे यांना सोबत घेणार नाही. त्याचा फटका मविआला बसेल. मात्र कुणीही एकत्रित आले तरी महायुतीवर कुठलाही परिणाम होणार नाही, असा दावा रामदास आठवले यांनी केला.

## शरद पवार-अजित दादांची चौथी भेट, ठाकरेंनंतर दोन्ही पवारांचं एकत्र येणं चर्चेत; जवळिकीची कारणं काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१पुणे**

ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र येतील, अशी चर्चा सध्या महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. तर दुसरीकडे शरद पवार आणि अजित पवार यांच्या बैठका आणि भेटींचं सत्रही वाढू लागलं आहे. गेल्या एका महिन्यात म्हणजेच २२ मार्च ते २२ एप्रिल या कालावधीत शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांची आज २१ एप्रिल रोजी ही चौथी भेट आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात काही मोठा बदल होणार का, अशी



कुजबूज सुरू झाली आहे.

या बैठकीमुळे काही नाराजीचे सूरही उमटले. शिवसेनेचे काही खासदार या भेटींवर नाराजी व्यक्त करत टीका करत आहेत. त्यामुळे आज पुण्यात शरद पवारांना पाहताच अजित पवार थेट बैठकीतून बाहेर पडल्याची माहिती मिळते.

आज सोमवारी पुण्यातील सारसण संकुल येथे ‘कृषी क्षेत्रात –ख तंत्रज्ञानाचा वापर’ या विषयावर आयोजित बैठकीत शरद पवार आणि अजित पवार एकत्र आले होते. या बैठकीला कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि कृषी क्षेत्रातील इतर अधिकारीही उपस्थित होते.

संपादकीय ......

# मान्सूनची उत्सुकता

भारतीय हवामानशास्त्र विभागाने देशभरात सरासरीच्या तुलनेत चांगला पाऊस पडेल, असा अंदाज दिला असला तरी पावसाचे वितरण पाहता देशात ईशान्य आणि दक्षिण व उत्तर भारतात सरासरीपेक्षा कमी पडण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राचा विचार करता मराठवाड्यासह राज्याच्या अंतर्गत भागात सरासरीपेक्षा चांगल्या पावसाच्या शक्यतेचे संकेत आहेत. ही शक्यता सर्वसाधारणत: ४० ते ५० टक्के आहे. मराठवाड्यासह आसपासच्या परिसरात ही शक्यता ६० ते ७० टक्के असून, येथेही सरासरीपेक्षा जास्त पडण्याची शक्यता आहे. हा निष्कर्ष दिसत असला तरी मराठवाड्यात खूप पाऊस पडणार आणि बाकीच्या ठिकाणी कमी पाऊस पडेल, असे गृहित धरता येणार नाही. कारण मान्सूनच्या दुसऱ्या टप्प्यातील पूर्वानुमान अद्याप आलेले नाही. मात्र, देशात सरासरीपेक्षा चांगला पाऊस पडेल ही चांगली बातमी आहे. राज्यात मार्च, एप्रिलमध्येच मान्सूनची उत्सुकता वाढीस लागते. दरम्यानच्या काळात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्थातून जागतिक आणि राष्ट्रीय हवामान अंदाज वर्तविले जातात. यात विशेषत: मान्सूनचा हंगाम कसा असेल, या विषयी माहिती दिली जाते.

आपल्याकडे १५० वर्षांपासून भारतीय हवामानशास्त्र विभाग अविरतपणे काम करत आहे. त्यांच्या दीर्घकालीन पूर्वानुमानावर सर्वांच्या नजरा असतात. नुकतेच वर्तविण्यात आलेल्या अंदाजानुसार, देशामध्ये चार महिन्यात सर्वसाधारणत: सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०५ टक्के पाऊस पडेल.

१९७१ ते २०२० दरम्यानच्या काळातील देशाची पावसाची आकडेवारी आहे; त्यावरून देशाचा पाऊस ८७ सेंमी आहे. त्याच्या १०५ टक्के पाऊस; ज्याला आपण दीर्घकालीन सरासरी म्हणतो. एवढा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.अर्थात हा संपूर्ण चार महिन्यांचा अंदाज आहे. एप्रिलच्या मध्यात केलेले हे अनुमान असून, यात काही त्रुटी असू शकतात. या त्रुटी पाच टक्के कमी व अधिक असू शकतात, हे देखील हवामान विभागाने नमूद केले आहे. सध्या देण्यात आलेला अंदाज हा देशासाठी आहे. एखाद्या भूभागासाठी किंवा राज्यासाठी नाही.हवामान विभागाने आता पहिल्या टप्प्याचे पूर्वानुमान दिले आहे. मे महिन्याच्या अखेरीस दुसऱ्या टप्प्याचे पूर्वानुमान हवामान खात्याकडून दिले जाईल. यात देशात एकंदर किती पाऊस असेल ? याची माहिती दिली जाईल. आज आपण १०५ टक्के पाऊस म्हटले असून, यात आणखी सविस्तर अंदाज दिला जाईल. भारताचे चार भूभाग म्हणजे उत्तर पश्चिम, उत्तर पूर्व, मध्य आणि दक्षिण भारत या चार भागात किती पाऊस असेल ? याचे पूर्वानुमान दुसऱ्या टप्प्यात दिले जाईल. जूनमध्ये पाऊस कसा असेल ? याची माहिती दिली जाईल.

केरळमध्ये मान्सून कधी दाखल होईल ? याचेही पूर्वानुमान दिले जाईल. येथे मान्सून दाखल झाला की त्याचा पुढील प्रवास सांगता येतो. पहिल्या टप्प्याच्या पूर्वानुमानात सरासरीपेक्षा जास्त पाऊस सांगण्यात आला आहे. दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत १०५ टक्के अधिक असेल. अल निनो आणि ला निना हे दोन्ही नाहीत. त्यामुळे परिस्थिती तटस्थ आहे. शिवाय आयओडी (इंडियन ओशियन डायपोल) तटस्थ असण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.

# शेतात गाळ भरताय? कोणत्या प्रकारचा गाळ भरणे योग्य? जाणून घ्या सविस्तर




**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

शेतात गाळ भरण्याचे फायदे अनेक आहेत पण गाळ काढण्यापूर्वी गाळाचे परीक्षण आणि गुणवत्ता निश्चिती करणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण यावरच तुमचे पुढील पिक नियोजन केले जाणार आहे.

## गाळाच्या गुणवत्ता कशी ठरवावी?

पाणी साठ्यांमधील गाळ काढण्यापूर्वी गाळाचे परीक्षण करणे एक आवश्यक गोष्ट आहे.

याचे कारण असे की गाळाच्या गुणवत्तेचा पीक उत्पादनावर, खतांच्या गरजा आणि पाण्याच्या गरजांवर लक्षणीय प्रभाव होतो.

म्हणून, शेतीसाठी वापरण्यापूर्वी गाळाचे गुणधर्म समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रयोगशाळेतील गाळाच्या नमुन्यांची चाचणी केल्याने त्याची रचना, रासायनिक गुणधर्म आणि पोषक घटकांबद्दल मौल्यवान माहिती मिळते.

प्रयोगशाळेतील विश्लेषणाद्वारे नमुन्यातील वाळू, गाळ आणि चिकणमातीचे प्रमाण निश्चित करण्यात येते.

कृषी वापरासाठी या तीन घटकांचे प्रमाण संतुलित राखणे आवश्यक आहे, कारण जास्त वाळूचे कण असल्यास पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

गाळाचा किसामू ८ पेक्षा जास्त नसावा.

कॅल्शियम कार्बोनेट १०% पेक्षा जास्त नसावे.

सोडियम १५% पेक्षा जास्त नसावे.

शेतीसाठी वापरण्यापूर्वी गाळाचे गुणधर्म समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

या घटकांची जास्त पातळी जमिनीची सुपीकता आणि पीक वाढीवर परिणाम करू शकते.

म्हणून, गाळाच्या नमुन्यांचे परिक्षण करून शेतकऱ्यांना शेतीसाठी गाळाची उपयुक्ततेचा योग्य अंदाज घेता येतो आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होते.

अचूक विश्लेषण सुनिश्चित करण्यासाठी, शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील मातीचे योग्य नमुने गोळा करून तालुका किंवा जिल्हा स्तरावरील शासकीय माती परीक्षण प्रयोगशाळेत विश्लेषण करून घ्यावे.

शेतातील माती परीक्षणासाठी कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, पाणी समिती सदस्य (तथडउ) किंवा छत्रुज टीम सदस्यांकडून मार्गदर्शन घेता येते. शेतीसाठी वापरण्यापूर्वी गाळाचे गुणधर्म समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

विश्लेषण अहवालाचा अभ्यास करून योग्य दर्जाचा आणि प्रमाणात गाळ वापरणे फायदेशीर ठरते.

# पेट्रोल डिझेल गॅस दरवाढीचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे निषेध

## जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.अमरावती–** पेट्रोल डिझेल आणि गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असतानाच आर्थिक टंचाईमुळे त्यांचेजीवन जगणे कठीण झाले आहे ही दरवाढ त्वरित थांबवावी याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन विविध मागण्यांची पूर्तता करण्याची ही देखील विनंती करण्यात आली.अमरावती शहर जिल्हाध्यक्ष प्रा . डॉ.हेमंत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन पेट्रोल,डिझेल आणि गॅस दरवाढीची तात्काळ वाढ रद्द करावी,सर्वसामान्य जनतेच्या जीवावर होणाऱ्या किमतीच्या वाढीच्या परिणामांचा गांभीर्याने विचार करा,दीर्घकालीन समाधानासाठी शास्वत व पर्यावरणीय दृष्टिकोनातून ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढवावा, गरिबांची आणि मध्यमवर्गीय कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शासन दरबारी करण्यात आली. गॅस, डिझेल आणि पेट्रोलच्या दरवाढीमुळे जीवनशैलीवर आणि आर्थिक स्तरावर मोठा परिणाम झाला आहे.अनेक वेळा तेल दरवाढीतला स्थगिती करण्याची वचनबद्धता दिली असताना देखील सरकारकडून कोणती ठोस भूमिका घेतली जात नाही, त्यामुळे सर्वसामान्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

सामान्य लोकांची परिस्थिती लक्षात घेता दरवाढ तात्काळ रद्द करावी अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रा. डॉ .हेमंत देशमुख,शहर युवक अध्यक्ष रोशन कडू यांच्या नेतृत्वात शुभम शोगोकार,अरबाज पठाण, निखिल भोजे,विशाल बोरखडे, आयुष वाघमारे, सतीश चर्फे, वेदांत उगले,रोहित दिवटे, शेख युसुफ,अब्दुल गफार,आदींनी निवेदन देऊन मागण्यांची पूर्तता करण्याची विनंती केली. यावेळी जिल्हाधिकारी यांच्या वतीने भटकर यांनी निवेदन स्वीकारून तात्काळ कारवाई करण्याची शासनाकडे मागणी करणार असे आश्वासन दिले.

# वर्तमानपत्र वाटणारा मुलगा झाला धर्मदाय आयुक्तालयात लिपीक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१दर्यापूर** – ११कोणतेही काम कमी नसते,आपल्या कुटुंबाला मदत व्हावी म्हणून अनेक युवक शिक्षण सोबतच वर्तमानपत्र वाटप करून आपल्या कुटुंबाला मदत करत असतात,अशाच प्रकारे वर्तमानपत्र वाटणारा मुलगा नवनित श्रीकृष्ण मदने याची नुकतीच राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून धर्मदाय आयुक्तालयात लिपिक म्हणून निवड झाली.तो रोज सकाळी वर्तमानपत्र विकायचा व भाजीपाला व्यवसाय सुद्धा करायचा, अनेक वर्ष संघर्ष करून त्याने स्पर्धा परीक्षेची तयारी अरबट अकादमी येथे केली. त्याचे या मेहनतीला फळ येत त्याने लिपिक पदाची नोकरी प्राप्त केली.त्यानिमित्त त्याचे शिंगणे न्यूज पेपर एजन्सी दर्यापूरचे संचालक विनोद पाटील शिंगणे,सोनाळेकर न्यूज पेपर एजन्सी दर्यापूरचे संचालक बाळ सोनाळेकर आदींनी त्याचे स्वागत करून अभिनंदन केले.–






## वाढत्या उकाड्यात शरीरही थंड ठेवतं अन् चरबीही कमी करतं हे खास सरबत,चवही मस्त

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

तुम्ही पाहिलं असेल तर वजन कमी करण्याचा विषय येतो तेव्हा एक्सपर्ट वेगवेगळ्या ड्रिंक्सबाबत सांगतात. कारण वजन कमी करण्यासाठी केवळ एक्सरसाईज किंवा डायटिंगच नाही तर हे वेगवेगळे नॅचरल ड्रिंक्सही खूप फायदेशीर ठरतात. लिंबू पाणी, हळदीचं पाणी, आल्याचं पाणी, ओव्याचं पाणी, मेथीचं पाणी, वेगवेगळ्या फळांचे ज्यूस यांचा यात प्रामुख्यानं समावेश होतो. तुम्ही सुद्धा शरीरात वाढलेली चरबी कमी करण्यासाठी एखाद्या अशाच नॅचरल आणि प्रभावी ड्रिंकच्या शोधात असाल तर एका ड्रिंकबाबत आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. हे ड्रिंक वजन कमी करण्यासोबतच पचन तंत्र सुधारतं, त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर ठरतं. तसेच शरीरातील विषारी तत्वही बाहेर काढतं.

चरबी आणि लठ्ठपणा कमी करण्यासाठी जे ड्रिंक एक्सपर्ट सजेस्ट करतात ते आहे बेलफळाचं सरबत. उन्हाळ्यात बेलफळाचं सरबत भरपूर प्यायलं जातं. कारण यानं शरीर आतून थंड राहतं. सोबतच पचन तंत्र मजबूत राहतं. पण अनेकांना हे माहीत नसतं की, हे नॅचरल आंबट-गोड सरबत शरीरात वाढलेली चरबी सुद्धा कमी करतं. ज्यामुळे तुमचं वजन कमी होतं. यात फायबर, व्हिटामिन्स आणि अँटी-ऑक्सिडेंट असतात. जे शरीरात भरपूर फायदे देतात. अशात बेलफळाच्या सरबताचे फायदे काय होतात हे जाणून घेऊ.

वजन कमी करतं

पोटासंबंधी वेगवेगळ्या समस्या दूर करण्यासोबतच बेलफळाचं सरबत वजन कमी करण्यासही मदत करतं. या सरबतानं शरीरात वाढलेली चरबी कमी होते. कारण यानं मेटाबॉलिज्म बूस्ट होतं आणि शरीरातील कॅलरी जळण्याचं काम वेगानं होतं. तसेच यानं पोट जास्त वेळ भरलेलं राहतं त्यामुळे जास्तीचं खाणंही टाळलं जातं.

पचनक्रिया सुधारते

बेलफळामध्ये असे काही नॅचरल गुण असतात जे पोटासंबंधी वेगवेगळ्या समस्या दूर करण्यास मदत करतात. अपचन, गॅस आणि बद्धकोष्ठता दूर करण्यास हे गुण मदत करतात. यात फायबरचं प्रमाण अधिक असतं, ज्यामुळे आतड्या साफ राहतात आणि पचनक्रिया आणखी चांगली होते.




बॉडी डिटॉक्स

बेलफळाच्या सरबतानं शरीरातील विषारी तत्व बाहेर पडून शरीर आतून साफ राहतं. हे सरबत जर नियमितपणे प्याल तर शरीरात जमा विषारी तत्व बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचा आणखी चमकदार आणि फ्रेश दिसते. शरीर हलकं वाटतं.

पोटातील सूज होईल कमी

वेगवेगळ्या कारणांनी पोटात आलेली सूज कमी करण्यासाठी सुद्धा बेलफळ फायदेशीर ठरतं. यातील अँटी-इन्फ्लामेटरी गुण पोटाच्या आतील सूज कमी करतात आणि पचन तंत्र मजबूत ठेवतात. या सरबताचं पोटाला थंडावा मिळतो आणि पोट शांत राहतं.

केस आणि त्वचेसाठी फायदेशीर

बेलफळाचं सरबत केवळ पोटासाठी आणि वजन कमी करण्यासाठीच फायदेशीर नाही तर केस व त्वचेसाठीही गुणकारी ठरतं. यातील अँटी-ऑक्सिडेंट्स आणि व्हिटामिन सी मुळे त्वचेची चमक वाढते. तसेच केस मजबूत होतात.

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात आता आदिवासी अध्ययन केंद्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात आता आदिवासी अध्ययन केंद्र सुरू करण्यात येत आहे. विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य मयुरी जवंजाळ यांनी विद्यापीठात आदिवासी अध्ययन केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव ऑक्टोबर २०२३ च्या सिनेट बैठकीत मांडला होता.

त्यावेळी तो आवाजी मतदानाने पारित होऊन व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसाठी पाठवण्याचे ठरले होते. फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीनेही त्यावर शिक्कामोर्तब करत आदिवासींच्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी या अध्ययन केंद्राला पाठबळ देण्याचा सकारात्मक निर्णय घेण्यात आला होता. दरम्यानच्या काळात या केंद्रासाठी आवश्यक कर्मचारी तसेच इतर सामग्री खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या निधीसह सविस्तर प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने एक समिती गठित करून त्याद्वारे प्रस्ताव राज्य शासनाला पाठवला. विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य मयुरी जवंजाळ यांनी विद्यापीठात आदिवासी अध्ययन केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव ऑक्टोबर २०२३ च्या सिनेट बैठकीत मांडला होता. या प्रस्तावाला १७ एप्रिल २०२५ रोजी राज्य शासनाने शासन निर्णय काढून मान्यता दिली आहे. अशीवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास व संशोधनासाठी हे केंद्र प्रभावी



ठरेल.या केंद्रासाठी आवश्यक कर्मचारी तसेच इतर सामग्री खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या निधीसह सविस्तर प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्याचे निर्देश देण्यात आले. या मान्यतेमुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक दर्जात वाढ होणार असून, हे केंद्र संशोधनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याच्या प्रतिक्रिया त्यामुळेच उमटत आहेत.–


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण


# जिल्ह्यात २.७५ लाख शेतकऱ्यांनी काढला फार्मर आयडी

## एप्रिल महिन्यात ५३.१२ टक्के शेतकरी नोंदणी




| तालुकानिहाय शेतकऱ्यांची नोंदणी | एकूण शेतकरी तालुका, | एकूण शेतकरी | नोंदणी झालेले टक्केवारी |
|---|---|---|---|
| अमरावती | ४२६५८, | १६४८८, | ३८.४७ |
| भातकुली | ३४१९८, | १८३०३, | ५२.१९ |
| नांदगाव खंडेश्वर | ४४ १८१, | २२८९६, | ५१.८२ |
| धामणगाव रेल्वे | ३५१२९, | १९३६७, | ५६.१३ |
| चांदूर रेल्वे | २६ ४४३, | १४५३२, | ५४.९६ |
| मोर्शी | २५७४३, | २६ ४४३, | ५४.४४ |
| वरुड | २४९०५, | ४७ ६७८, | ५२.२४ |
| तिवसा | ३०२९२, | १६१४४, | ५३.३० |
| चांदूरबाजार | ४५८५७, | २३ ९०९, | ५२.१४ |
| अचलपूर | ४३२९३, | २३०५१, | ५३.२४ |
| दर्यापूर | ४९३६१, | २४ ५३७, | ४९.७१ |
| अंजनगाव सुर्जी | ३५५४८, | २१४०३, | ६०.२२ |
| चिखलदरा | १३५२६, | ७६३४, | ५६.४४ |
| धारणी | २२४५६, | १६७८१, | ७४.७३ |
| एकुण | ५१८४०७, | २७५३९७, | ५३.१२ |

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती**

केंद्र शासनाच्या ग्री स्टॉक योजनेअंतर्गत जिल्ह्यातील दोन लाख ७५ हजार शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढण्याची माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली. या योजनेची १५ एप्रिल ही अंतिम तिथी असली तरी फक्त ५० टक्के शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढण्याचे सांगण्यात आले. राज्यातील कृषी क्षेत्रामध्ये डिजिटल सेवा वापरून शेतकऱ्यांवरील विविध शासकीय योजनांचा लाभ वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचण्यासाठी केंद्र सरकारची अ‍ॅग्रीस्टॉक योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या अभियानात एप्रिल महिन्यात ५३.१२ टक्के शेतकरी नोंदणी केली आहे. १५ एप्रिल ही या योजनेसाठी नोंदणीकरिता अंतिम तारीख होती. जिल्ह्यात एकूण ५ लाख १८ हजार४००७ लाभार्थी शेतकरी असून अंतिम दिवसापर्यंत दोन लाख ७५ हजार ३९७ शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठीनोंदणी केली आहे. त्याची टक्केवारी केवळ ५३.१२% असल्याचे कृषी विभागाच्या वतीने दिलेल्याअहवालातून दिसून येते. आधार लिंक केलेले शेतकरी व शेतीची माहिती, हंगामी पीक नोंदणी हंगामनिहायपिकाची माहिती, भू संदर्भित नकाशे असे तीन मूलभूत माहिती तसेच माहिती संच तयार करण्यासाठी वअनुदानावर आधारित योजना बनविण्यासाठी हा तीन मूलभूत माहितीचा संच आवश्यक आहे.

### सयोजनेपासून अपेक्षित लाभ

पी एम किसान योजनेतील लाभ प्राप्त करणे सोपे होईल. प्राप्त लाभार्थ्यांना पूर्णपणे कव्हर करण्यास मदत होईल. कर्ज कृषी निधी इंफ्रास्ट्रक्चर योजना यासाठी नोंदणी सुलभ होईल. पिक विमा आणि आपत्ती व्यवस्थापनसाठी सर्वेक्षण सोपे होईल. किमान आधारभूत किमतीवर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी होईल. कृषी कर्ज व सेवा पुरविणाऱ्या संस्थांना डेटा उपलब्ध होईल. बारकाईने सत्यापण न करता योजनांचा लाभ त्वरित मिळेल, शेतकऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन व नवीन कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येईल.

# अमरावतीचे तापमान पोहचले ४४.४अशांवर

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती–** विदर्भाला उन्हाच्या तीव्र झळा बसू लागल्या आहेत. उष्णता आणि उकाडा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दोन दिवस ढगाळ वातावरण होते. त्यामुळे उकाड्यापासून सुटका होईल, असे वाटत असतानाच तापमानाचा पारा वाढला आहे. अमरावतीमध्ये ४४.४ डिग्री सेल्सीअस तापमान असल्याची नोंद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे पुढील तीन दिवस उष्णतेची लाट राहणार असल्याचे हवामान विभागाने कळविले आहे.विदर्भावर सूर्य कोपल्याचे दिसून येत आहे. दररोज तापमान वाढत आहे. अमरावतीचे तापमान ४४ डिग्रीच्यावर असल्याची नोंद करण्यात आली आहे. रविवारचे तापमान ४४.४ अंश असल्याची नोंद आहे. दुपारी ११ वाजतापासूनच रस्ते सुनसान दिसून येतात. १२ वाजतापासून दुपारी ५ वाजे पर्यंत उन्हामुळे नागरिक



घराच्या बाहेर पडने टाळत असून उन्हात जायचे असेल तरी टोपी, दुप्पटा, चष्मा, सनकोट यांचा वापरकेल्या जात आहे. तर दुसरीकडे मात्र ४४ डिग्री तापमानातसुध्दा फुटपाथवर रोजगार थाटून बसणारे व्यावसायिक मात्र ऐवढ्या उन्हात काम करतांना दिसतात. दुपारी एसटी बस स्टैंड, मुख्य मार्केट, रेलवे स्टेशन, हॉस्पीटलमध्ये सुध्दा गर्दी कमी झाल्याचे दिसून येते. रात्रीचे तापमानसुध्दा जास्त राहते. त्यामुळे दुपार सोबतच रात्रीसुध्दा कुलर काम करित नसल्याने नागरिक गर्मीमुळे चांगलेच अस्वस्थ होत आहेत.

# वानखडे, नाईक, बोके, कावरे, चौबे, गुहे बनले मंडळ अध्यक्ष

## भाजपा अमरावती शहर जिल्हामंडळ अध्यक्ष जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती** भारतीय जनता पार्टी शहर जिल्हा मंडळाच्या अध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली. त्यामध्ये संत गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष अभिजित वानखडे, कॉटन मार्केट मंडळ सचिन नाईक, विद्यापीठ मंडळ प्रफुल्ल बोके, स्वामी विवेकानंद मंडळ संतोष कावरे, अंबा मंडळ मनीष चौबे, साई मंडळ भारती गुहे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. बडनेरा मंडळाच्या अध्यक्षाचे नाव स्थगित ठेवण्यात आले.भारतीय जनता पार्टीच्या अमरावती शहर जिल्ह्याच्या संघटन पर्व अभियानानुसार मंडळ अध्यक्ष निवडणुकीच्या संदर्भात भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालय मुंबई येथे महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश महामंत्री रणधीर सावरकर, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, आमदार विक्रांत पाटील, प्रदेश महामंत्री माधवी नाईक, प्रदेश महामंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, विदर्भसंघटन मंत्री आणि इतर मान्यवर उपस्थित होते. बैठकीत ठरल्याप्रमाणे २० एप्रिल २०२५ रोजी नवनिर्वाचित मंडळ अध्यक्षांची घोषणा करण्यात आली.




# वडाळी वनपरिक्षेत्रात कृत्रिम पाणवठे भागवितात वन्यप्राण्यांची तहान

## पानवठ्यात टँकरने नियमित पाणी पुरवठा

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती** – वडाळी वनपरिक्षेत्रामध्ये वन्य प्राण्यांची संख्या पाहता आणि वाढता उन्हाचा पार पाहता वन विभागाने वडाळी वन परिक्षेत्रात सहा कृत्रिम पानवठे तयार केले असून नियमित या पानवठ्यात टँकरने पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे वन प्राणी शहराच्या दिशेने भटकत नाहीत.वडाळी वन परिक्षेत्रात बिबट, मोर, हरीण , रानडुकर, निलगाय, ससे असे बरेच वन्य प्राणी आहेत. तसेच बिबटची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वडाळी । वनपरिक्षेत्रात बिबटची संख्या ४० ते ५० च्या आसपास असावी हे नाकारता येत नाही. तसेच हरीण व मोरांची सख्यासुध्दा जास्त प्रमाणात आहे. या जंगल परिसरात वेगवेगळे पक्षीसुध्दा मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु उन्हाळा आला की वन्य प्राण्यांचा पिण्यांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. जंगलात प्राण्यांना पिण्याकरिता पाणी मिळाले नाही तर ते शहराच्या दिशेने येतात. त्यामुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच शहरालगत नवीन वस्ती झपाट्याने वाढत असून काही कॉलेज व शाळा सुध्दा शहराच्या बाहेर वन विभागाच्या जागेलगत आहेत. वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी सतत या परिसरात गस्तीवर



राहतात. तसेच उन्हाळ्यात पाण्याची पातळी कमी होते त्यामुळे जंगलातील पाणवठे व कृत्रीम पानवठ्यात मुबलक पाणी साठा नसतोत्यामुळे प्राणी पाण्याच्या शोधात शहराकडे येतात. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून व वन्य प्राण्यांना मुबलक पाणी जंगलात मिळावे याकरीता वन विभागाने वडाळी वन परिक्षेत्रात सहा कृत्रीम पानवठे तयार केले असून रोजदुपारी या पानवठ्या टँकरने पाणी पुरवाठा केला जातो. प्राण्यांना जंगलातच मुबलक पाणी मिळत असल्यामुळे सायंकाळच्या सुमारास या पानवठ्यावर निरनिराळे प्राणी व पक्षी पाणी पिण्याकरिता उतरत आहेत.

# उद्या आणि परवाला आकाशात होणार ताऱ्यांची दिवाळी

## ताशी १० लिरिड्स उल्कावर्षाव बघण्याची खगोलप्रेमींना संधी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१ अमरावती** – उद्या मंगळवार आणि बुधवार २२ व २३ एप्रिलला आकाशात ताऱ्यांची दिवाळी दिसणार आहे. मुळात हा ताऱ्यांचा उल्का वर्षाव राहणार असून, काही ठिकाणी तो डोळे दिपवून टाकेल, एवढा रोमांचक असेल. मराठी विज्ञान परिषदेने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार दरवर्षी १५ ते २९ एप्रिल दरम्यान हा उल्का वर्षाव उत्तर आकाशात दिसतो. परंतु त्याची सर्वोच्च तीव्रता ही २२ व २३ एप्रिलला असते.

या खगोलीय घटनेला शास्त्रीय भाषेत लिरिड्स उल्कावर्षाव असे म्हटले जाते. ही नियमित खगोलीय घटना असून त्याद्वारे ताशी १० उल्का बघण्याची संधी अमरावतीकरांना प्राप्त होणार आहे. हा उल्कावर्षाव आकाशातील लिरा आणि हरक्यूलिस नक्षत्रांच्या जवळ असलेल्या वेगा ताऱ्याजवळ स्थित आहे. या उल्का वर्षावादरम्यान ताशी ५ ते २० उल्का दिसू शकतील. लायरिड्स उल्का वर्षाव थॅचर या धूमकेतूशी संबंधित आहे. हा धूमकेतू दर ४१५.५ वर्षांनी सूर्याभोवती एक प्रदक्षिणा घालतो. या आधी शेवटची प्रदक्षिणा १८६१ मध्ये झाली होती. त्यावेळी हा धूमकेतू अगदी सूर्याच्या जवळ



पोहोचला होता.

मराठी विज्ञान परिषदेचे पदाधिकारी प्रा. प्रवीण गुल्हाने व विजय गिरुळकर यांच्या मते, हा उल्कावर्षाव १७ एप्रिलपासून सुरू झाला आहे. सुरुवातीच्या टप्प्यात या उल्का अत्यंत संथगतीने पडतात. त्यामुळे त्याचे दृश्य अगदी स्पष्ट दिसून येत नाही. त्यानंतर २२ व २३ एप्रिलला उल्का वर्षावाचे प्रमाण वाढेल. हा उल्कावर्षाव २६ एप्रिलपर्यंत चालणार आहे. इ. स. पू. ६८७ मध्ये चीनमध्ये पहिल्यांदा लिरिड्स उल्का वर्षाव दिसून आला होता. ही लिरिड्स उल्कावर्षाव पाहण्याची संधी आता अमरावतीकरांनाही चालून आली आहे. उल्का वर्षावादरम्यान दर तासाला ५ ते २० उल्का दिसू शकतात. त्यांचा वेग ताशी २९ मैल इतका आहे, तर जास्तीत जास्त संख्या ताशी १०० असू शकते.

निरीक्षण कुठून करावे ?

चंद्र मावळल्यानंतर आणि पहाटेच्या आधी रात्रीच्या अंधारात हा उल्का वर्षाव छान दिसेल. उल्का वर्षावाचे हे दृश्य पाहण्यासाठी शहरापासून दूर असलेल्या, प्रकाशाचे प्रदूषण नसलेल्या आणि आजूबाजूचा परिसर पूर्णपणे अंधारलेला असेल अशी जागा निवडावी, असेही मराठी विज्ञान परिषदेने कळवले आहे.

# विद्यार्थ्यांच्या विशेष नैपुण्यांचा होणार विकास

## राज्यातील आठ निवासी शाळांमध्ये अमरावतीचा नंबर



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती–** बदलत्या काळाच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांच्यातील विशेष नैपुण्यांचा विकास होणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून, शालेय शिक्षण विभागाने राज्यात आठ निवासी शाळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये अमरावतीचीही निवड करण्यात आली आहे.

या शाळा 'आनंद गुरुकुल (विशेष नैपुण्य) निवासी शाळा' या नावाने ओळखल्या जाणार आहेत. प्रत्येक शाळेची पटसंख्या २०० एवढी असेल. या शाळांसंबंधी विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने जाहीर केला. या निवासी शाळा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासूनच सुरू होणार आहेत.

विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच २१व्या शतकाची गरज विचारात घेऊन कला, क्रीडा, शास्त्र व तंत्रज्ञान, अपारंपरिक ऊर्जा, संवाद कौशल्य, वित्तीय सेवा, आरोग्य सेवा, व्यवस्थापन, जागतिक पर्यटन, कृत्रिम बुद्धिमत्ता, शाश्वत विकास अशा विविध विषयांच्या विशेष नैपुण्य शाखांचे ज्ञान देणे गरजेचे आहे. या विचारातूनच राज्य सरकारने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून 'आनंद गुरुकुल निवासी शाळा' सुरू करण्याचा निर्णय घेतला.

याकरिता विदर्भातील नागपूर आणि अमरावती या दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. उर्वरीत जिल्ह्यांमध्ये मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आणि लातूर यांचा समावेश आहे. त्यासाठी अभ्यासगट स्थापन होणार आहेत.

त्याच्या अध्यक्षस्थानी शिक्षण आयुक्त असतील. याशिवाय प्राथमिक शिक्षक परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक, एससीईआरटीचे संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाचे शिक्षण संचालक, सहसंचालक आणि शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव हे गटाचे सदस्य असतील.-

# खाद्यपदार्थ विकणाऱ्यांनी आरोग्य विषयक ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे

## आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती** खाद्य पदार्थ बनविणाऱ्यांनी आणि विक्रेत्यांनी आरोग्यविषयक ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे, असे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.महानगर पालिकाचे कार्यक्षेत्रात असलेले खानावळ, हॉटेल, लॉजिंग, दूध डेअरी, किराणा दुकान, पॅथॉलॉजी लॅब, स्विमिंग पूल, पाच हजार स्क्वेअर फूट वरील बांधकाम, मेडिकल स्टोअर, अ‍ॅब्युलन्स, वाइन शॉप, बिअर शॉप, ब्युटी पार्लर, बार रेस्टॉरंट, मंगल कार्यालय, व खाद्य पदार्थ तयार करून विक्रेता यांचे दुकान व आस्थापना यांना व्यवसाय करण्यासाठी त्यांच्या दुकानात काम करणाऱ्या कर्मचारी यांची आरोग्यविषयक तपासणी करावी, व व्यवसायच्या ठिकाणची व दुकानाची सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत पाहणी केल्यानंतर विहित नमुण्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग महानगर पालिका, येथे अर्ज सादर करून आपल्या आस्थापनाचे आरोग्य विषयक ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे.सदर अर्ज अमरावती महानगर पालिकेच्या वेबसाईट वर सुद्धा उपलब्ध असून जर कोणतीही अर्ज करताना अडचण निर्माण झाल्यास साथ रोग विभागाशी संपर्क करून आपल्या अडचणीचे समाधान करून आरोग्य विषयक नाहरकत घेण्यात यावे, असे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

# पोलीस कर्मचाऱ्याचा बालिकेवर अतिप्रसग करण्याचा प्रयत्न

## तत्काळ कर्मचाऱ्याला केले निलबिल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती** : शेजारी राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर पोलीस कर्मचाऱ्यानेच अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याची घटना नांदगावपेठ ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. घटनेची गंभीरता पाहता पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी तत्काळ संबंधित पोलीस कर्मचाऱ्याला निलंबित केले. अरविंद विठ्ठल सोळंके (क्य ३८, रा. तपोवन) असे निलंबित कर्मचाऱ्याचे नाव आहे.

पोलीस कर्मचारी अरविंद सोळंके हा आयुक्तालयातील नियंत्रण कक्षातील डायल ११२ येथे कार्यरत आहे. परंतु डिसेंबर २०२४ पासून तो सिक रजेवर आहे. तसेच पत्नी व एका लहान बाळासह तो तपोवन परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये राहतो. तसेच पीडितासुध्दा त्याच अपार्टमेंट मध्ये परिवारासह राहते. व्यामुळे दोन्ही कुटूंबाचे चांगले संबंध आहेत. दरम्यान अरविंदन



'पीडितेच्या व्हॉटसअ‍ॅपवर तू मला खूप आवडते मी तुझ्याशी लाम करणार, माझे तुझ्यावर प्रेम आहे. असा मेसेज पाठवीला होता. तसेच बिल्डिंग खाली उभा राहून तो नेहमी पीडितेला पाहत होता आणि हाताने इशारे करीत होता. परंतु पीडिताने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे तो तिचा पाठलाग करु लागला. तसेच माझ्या सोबत बोल नाहीतर तुझ्या घरच्या लोकांना त्रास देणार तसेच मी पोलीस आहे तुला आणि तुझ्या घरच्यांना खोट्या गुन्ह्यात फसवेल, अशी धमकी दिली. त्यामुळे पीडिता घाबरली आणि घरातून बाहेर जाणे बंद केले. ८ ते १० दिवसाआधी पीडिता बिल्डिंगमधून खाली उतरत असताना अरविंदने तिला पार्किंगमध्ये पकडले आणि तिचा हात पकडून तिला जवळ ओढले आणि अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पीडिताने आरडाओरडा केला. त्यानंतर घडलेला सर्व प्रकार तिने आईला सांगितला. तेव्हा लगेच पीडिताच्या आईने ठाण्यात धाव घेतली. त्या आधारावर नांदगावपेठ पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करून अरविंद सोळंकेवा शोध सुरु केला. परंतु तो शहरातून पसार झाला आहे.

# शिक्षक महासंघ व भाजप शिक्षक आघाडीचा शिक्षक मेळावा

## अमरावतीचा भावी शिक्षक आमदार भाजपचाच राहणार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दावा







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

शिक्षकांचा सन्मान करून त्यांना सशक्त करण्याचे आमच्या पक्षाचे व सरकारचे धोरण असून त्यासाठी आपला आमदार असणे महत्त्वाचे आहे. भाजपमध्ये उमेदवारी कोणीही मागितली किंवा कोण आमदार होईल हे महत्त्वाचे नसले तरी अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाचा आमदार हा भाजपचाच असला पाहिजे आणि तो राहणारच असा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. शिक्षकांची अग्रगण्य संघटना असलेल्या शिक्षक महासंघ व भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडीच्या संयुक्त विद्यमाने व शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांच्या पुढाकाराने १९ एप्रिल रोजी अमरावती मधील पीडीएमसीच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात शिक्षक मेळावा व नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.शिक्षकांना मार्गदर्शन करताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्राचा संकल्प केला असून हा संकल्प पूर्ण करण्यासाठी भाजप महायुतीचा आमदार असणे गरजेचे असल्याचे सांगून भावी शिक्षक आमदार हा आपलाच असला पाहिजे असा निर्धार करण्याचे आवाहन बावनकुळे यांनी उपस्थित शिक्षकांना केले. अमरावती शिक्षक मतदार संघ जिंकून आणण्यासाठी जिल्ह्यातील आमदारांनी चंद्रशेखर भोयर यांच्या रूपात कोहिनूर हिरा शोधून आणल्याचे सांगून चंद्रशेखर भोयर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यापासून जेवढे प्रश्न सभागृहात सभागृहाबाहेर राहून मांडले आणि ते सोडविण्याचा प्रयत्न केला, तेवढे प्रश्न विद्यमान आमदाराने सभागृहात राहून सुद्धा मांडले नसल्याची खंत व्यक्त करीत बावनकुळे यांनी विद्यमान आमदारावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला.भाजपचे पश्चिम विदर्भ प्रमुख, माजी कामगार मंत्री डॉ. संजय कुटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास राज्याचे महसूल मंत्री व भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.भाजपचे अमरावती जिल्हा अध्यक्ष खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, धामणगावचे आमदार प्रताप अडसड . तिवसा आमदार राजेश वानखडे, अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे, मेळघाटचे आमदार केवलराम काळे, मोर्शीचे आमदार उमेश यावलकर, गो सी टोम्पे सार्वजनिक ट्रस्टचे अध्यक्ष भास्कर टोम्पे, राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजचे अध्यक्ष योगेंद्र गोडे, श्री समर्थ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विनोद कोलवाडकर ,भाजपचे प्रदेश सचिव जयंत डेहनकर, रवींद्र खांडेकर, भाजपचे जिल्हा महामंत्री विवेक गुल्हाने, भाजप प्रदेश उपाध्यक्ष अनिल गावंडे, श्रीमती संगीताताई शिंदे, भाजप प्रदेश प्रवक्ता विनोद वाघ, जिल्हा महामंत्री नितीन गुडदे, श्रीमती छायाताई दंडाळे, जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्याध्यक्ष रितेश खांडेकर, अमरावती विभाग अध्यक्ष मिलिंद सोळंके, भाजप शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष घोगरे, संध्याकाळी टिकले, विनोद वाघ ,बादल कुलकर्णी, अनिताताई तिखिले, रविराज देशमुख आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीमाता, स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

नवनिर्वाचित आमदारांचा सत्कारशिक्षक मेळाव्याच्या निमित्ताने शिक्षक महासंघ व भाजप शिक्षक आघाडीतर्फे याप्रसंगी जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार करण्यात आला. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्यक्रमाचे आयोजक चंद्रशेखर भोयर यांच्या हस्ते आमदार प्रवीण तायडे, आमदार प्रताप अडसड,आमदार राजेश वानखडे, आमदार उमेश यावलकर,आमदार केवळराम काळे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ तसेच श्री गणेशाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमात भाजपचे शहर अध्यक्ष व माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी देखील आपले मत व्यक्त केले तसेच माजी खासदार नवनीत राणा यांनी आपल्या शैलीत शिक्षक मेळाव्यास संबोधित केले.चंद्रशेखर भोयर गेल्या काही वर्षांपासून शिक्षकांसाठी संघर्ष करीत असून हा संघर्ष वाया जात नाही, भोयर यांनी कणखरपणे केलेल्या संघर्षाला यावेळी नक्कीच यश मिळेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. शिक्षकांनी आपला मान सन्मान कायम ठेवावा असे सांगून सरकार जो शब्द देईल तो शब्द पूर्ण करणार अशी असा आपणास विश्वास असून तुमच्या सर्व समस्या जोपर्यंत मार्गी लागत नाही तोपर्यंत आम्ही तुमच्या सोबत लढत राहू अशी ग्वाही देखील नवनीत राणा यांनी शिक्षक वर्गास दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जुनघरे सर यांनी केले तर शितल मेंढे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास अमरावती जिल्ह्यातील शिक्षक बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक महासंघाचे सर्व पदाधिकारी व भाजप शिक्षक आघाडीचे सर्व पदाधिकारी, सदस्य यांनी परिश्रम घेतले.

### बोगस मतदानामुळे माझा पराभव

भोयर राज्यातील भाजप नेतृत्वावर विश्वास ठेवून मी गेल्या एक महिन्यापूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला. नेतृत्वाने मोठ्या विश्वासाने माझ्यावर सहसंयोजक पदाची जबाबदारी सोपवली, या जबाबदारीला पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न करून अमरावती विभागात शिक्षकांची मोठी फळी उभारणार असा विश्वास मी आपनास देत असल्याचे कार्यक्रमाचे आयोजक चंद्रशेखर भोयर यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले.गेल्या निवडणुकीत बोगस मतदानामुळे माझा पराभव झाल्याचे स्पष्ट करीत शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी शिबिराचे आयोजन, संच मान्यता, शाळा बंद पडण्याचा धोका, शिक्षण विभागातील भ्रष्टाचार, शाळांमधील संडास बाथरूमची अवस्था अशा विविध समस्यांचा उहापोह करीत या समस्या सोडविण्यासाठी पालकमंत्री बावनकुळे यांनी पुढाकार घ्यावा अशी विनंती चंद्रशेखर भोयर यांनी आपल्या प्रास्ताविकातून केली.–

# कर वसुलीत दर्यापूर पालिकेची मोठी झेप

## ६ कोटींच्या उद्दिष्टापैकी ४ कोटींची वसुली; गतवर्षीच्या तुलनेत दुप्पट वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ दर्यापुर–** दर्यापूर नगरपालिकेने यंदा कर वसुलीमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये पालिकेने ३ कोटी ९३ लाख ७२ हजार रुपयांची वसुली केली आहे. ही रक्कम एकूण उद्दिष्टाच्या ६०.४९ टक्के आहे.



नगरपालिकेने या वर्षासाठी ६ कोटी ५० लाख ८७ हजार रुपयांचे उद्दिष्ट निश्चित केले होते. शहरातील १२ प्रभागांमधील १२,१९५ मालमत्ताधारकांकडून ही रक्कम वसूल करायची होती. गतवर्षी केवळ २९ टक्के वसुली झाली होती. यंदा हे प्रमाण दुप्पटीहून अधिक वाढले आहे.पालिकेने जानेवारीपासून विशेष वसुली मोहीम राबवली. यासाठी सर्व विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. या पथकांनी थकबाकीदारांच्या घरोघरी जाऊन वसुलीचे प्रयत्न केले.मालमत्ता कर, शिक्षण कर, वृक्षकर, साफसफाई कर, दिवाबत्ती कर, अग्निशमन कर आणि स्वच्छता कर अशा विविध करांची वसुली करण्यात आली. या करातून जमा होणारी रक्कम शहराच्या विकासकामांसाठी वापरली जाते.पालिकेच्या अनुदानावर परिणाम होऊ नये म्हणून कर विभागातील विभागप्रमुख, देयक संग्राहक, लिपिक आणि इतर कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. तरीही अनेक मालमत्ताधारकांकडे अजूनही थकबाकी शिल्लक आहे. पालिका प्रशासन उर्वरित थकबाकी वसुलीसाठी प्रयत्नशील आहे.

# मोझरीत एका ठिकाणी सापडली दिवळ सापाची पिल्ले

## पाईपलाईन खोदकामात आढळली ४० पिल्ले, सर्पमित्रांनी जंगलात सोडले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ अमरावती–** मोझरी येथील आंबेडकर नगरात एक अनपेक्षित घटना घडली आहे. घरगुती नळाच्या पाईपलाईनचे खोदकाम करताना दिवळ सापाची ४० पेक्षा जास्त पिल्ले आढळून आली. ही घटना शनिवारी संध्याकाळी सहा वाजताच्या सुमारास घडली.




मोझरी ग्रामपंचायतीने पाण्याची टंचाई टाळण्यासाठी जुन्या पाईपलाईनची दुरुस्ती आणि नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेतले होते. विक्की वानखडे यांच्या घराजवळ खोदकाम करताना मजुरांना ही पिल्ले दिसली. स्थानिकांनी लगेच सर्पमित्र नासीर शेख यांना बोलावले.

नासीर शेख यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून सर्व पिल्लांचे रेस्क्यू केले. प्रत्येक पिल्लू ५ ते ७ इंच लांब होते. सर्पमित्रांनी या पिल्लांना सुरक्षितपणे जंगल परिसरात सोडले. त्यांच्या मते ही पिल्ले सुमारे आठवड्यापूर्वी जन्मली असावीत.सर्पमित्रांनी स्पष्ट केले की ही सर्व पिल्ले दिवळ प्रजातीची असून ते अजिबात विषारी नाहीत. सामान्यतः अंड्यातून पिल्ले बाहेर आल्यानंतर साप ती जागा सोडून जातो. या प्रकरणातही असेच झाले असावे असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# ५६ प्रकल्पांत ४६.२९% जलसाठा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ अमरावती–** एकीकडे तापमान वाढत आहे तर दुसरीकडे पाण्याचा उपसा सुरू आहे. त्यामुळे जिल्ह्यातील लघु, मध्यम प्रकल्पातील जलसाठा कमी होत आहे. जिल्ह्यातील ५६ प्रकल्पांतील साठा हा ४६.२९ टक्के आहे. यातील ४८ लघुप्रकल्पापैकी तब्बल २८ प्रकल्प, तलाव कोरडे पडले असून ३ मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. अनेक वाड्या, वस्त्यांवर पाणी टंचाई उद्भवल्याचे चित्र दिसून येत आहे.



गतवर्षी जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रातील पावसामुळे १ मोठा प्रकल्प, ७ मध्यम आणि ४८ लघु अशा ५६ प्रकल्पातील जलसाठ्यात वाढ झाली होती. मात्र, आता उन्हाळ्याची तीव्रता वाढली आहे. बाष्पीभवनामुळे या ५६ प्रकल्पांचा साठा कमी होत आहे. या सर्व प्रकल्पांमध्ये शनिवार, १९ एप्रिलला ४६.२९ टक्के जलसाठा आहे. २०२४ मध्ये या सर्व प्रकल्पांत १९ तारखेला ४६ टक्के जलसाठा होता. यातील ४८ लघुप्रकल्पांपैकी २८ लघुप्रकल्प आटले आहेत. त्यामुळे या प्रकल्पांवर अवलंबून असलेल्या गावांवर आगामी काळात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाईची शक्यता जाणवणार आहे

# उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांना नवनीत राणांच्या शुभेच्छा

## एकत्र आले, तर कुणी 'कांटा' बनणार नसल्याची दिली ग्वाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ अमरावती–** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या युतीच्या प्रस्तावावरून अवघा महाराष्ट्र ढवळून निघू लागला आहे. भाजप महायुतीमधून या युतीवर प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेविरुद्ध पंगा घेतलेल्या माजी खासदार भाजप नेत्या नवनीत राणा यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. युतीसाठी शुभेच्छा देताना, दोघं सोबत येत असतील, तर कुणी कांटा बनणार नाही, अशी ग्वाही देखील नवनीत राणा यांनी दिली.नवनीत राणा म्हणाल्या, परिवार संपूर्ण देशासमोर आला, तो वाद बाहेर आणणारे कोण होते, ते आम्हाला माहित होते. राजकारणी व्यक्ती कमी, पण एका कुटुंबात राहणारी व्यक्ती म्हणून आम्ही त्या दोघांना शुभेच्छा देतो.ते जर सोबत येत असतील, तर त्यांच्यामध्ये कुणी कांटा बनणार नाही. हिंदुत्ववादाची लढाई भगव्यासाठीच राहणार आहे, असेही राणा यांनी सांगितले–



# वादात मध्यस्थी करणाऱ्या युवकावर हल्ला, तरुण गंभीर जखमी, आरोपी फरार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१ अंजनगाव सुर्जी–**अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अडगाव खाडे येथे एका वादात मध्यस्थी केल्याने एका युवकावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला. जखमी युवक प्रदीप इंगळे (३३) यांच्यावर नागपूरच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती अशी की, गावातील रवी सरदार आणि शुभम इंगळे यांच्यात वाद झाला होता. प्रदीप इंगळे यांनी या वादात मध्यस्थी करून रवी सरदार यांची समजूत काढली आणि त्यांना घरी नेले. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता शुभम इंगळे प्रदीपच्या घराजवळ आला. त्याने प्रदीपला शिवीगाळ केली. प्रदीपने विचारणा केली असता शुभमने त्याच्या डोक्यावर आणि पाठीवर कुऱ्हाडीने वार केले.

या प्रकरणी मीना सुनील इंगळे (३६) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी शुभम इंगळे, त्याचे वडील श्रीकृष्ण इंगळे आणि इतर कुटुंबीयांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम १०९(१), ११८(२), ३५२, ३५१(२) ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणातील चारही आरोपी फरार आहेत.

# आदिवासी, सामाजिक न्याय विभागाचा आराखडा तयार करावा –पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## क्षेत्र, जातीनुसार मॅपिंग करावे महिला, दिव्यांगाना लाभ पोहोचवा उद्देशिकेचे प्रत्येक घरी वाटप करावे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती,**

सामाजिक न्याय आणि आदिवास विकास विभागातर्फे योजना राबविताना जिल्ह्यात असलेल्या जातीनिहाय संख्येचे मॅपिंग करावे. त्यांना कोणत्या योजना आवश्यक आहेत, याचा तपशिल तयार करावा, त्यानुसार येत्या वर्षाचा आराखडा तयार करावा, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. सामाजिक न्याय भवन येथे सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागाची आज आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रविण तायडे, उमेश यावलकर, प्रविण पोटे, धारणीच्या प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी अनूसुचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या समस्या जाणून त्यानुसार योजना तयार कराव्यात.



जिल्ह्याच्या दृष्टीने अमरावती हे शिक्षणाचे केंद्रबिंदू असल्याने या सर्व घटकांसाठी वसतिगृहे असावेत, यासाठी प्रस्ताव सादर करावेत. त्यानुसार निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात येतील आणि आवश्यकतेनुसार इमारती तयार झाल्यास येत्या वर्षांपासून विद्यार्थ्यांची सोय होईल. तसेच विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उच्च शिक्षणासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असल्याने कोणत्याही मध्यस्थाशिवाय प्रमाणपत्रांची पूर्तता करण्यात यावी.विशेष घटक योजनेचा आराखडा तयार करताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. यावर्षी प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि नाविण्यपूर्ण योजनांचा समावेश करावा. त्याचप्रमाणे विशेष घटक आणि आदिवासी विभागाच्या योजनांमधून महिलांच्या आरोग्याविषयी सुरक्षितता बाळगण्यासाठी उपाययोजना कराव्यात. शैक्षणिक सुविधांमध्ये शाळांमध्ये पाणी आणि विजेची सोय करण्यात यावी. यातून मॉडेल शाळा तयार करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. जिल्ह्यातील प्रत्येक मागासवर्गापर्यंत शासना च्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी जातीनिहाय आणि क्षेत्रनिहाय मॅपिंग करावे. योजनांच्या लाभानुसार जिओ टॅगिंग करावे. दिव्यांग हा महत्वाचा घटक असल्याने त्यांचेही येत्या चार महिन्यात मॅपिंग करावे. सामाजिक न्याय विभागातर्फे २७ योजना राबविण्यात येत आहे. याचा लाभ नागरिकांना होण्यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे आवश्यक आहे. मेळघाट परिसरात असलेल्या आदिवासी समाजाच्या बोलीभाषा आणि संस्कृतीनुसार त्यांना योजनांची ओळख करून दिल्यास त्यांच्यापर्यंत लाभ सहजपणे पोहोचविणे शक्य होणार आहे. त्यासोबतच प्रत्येक घरी संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करावे, जेणेकरून संविधानाबाबत नागरिकांमध्ये असलेला संभ्रम दूर होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान आज सकाळी पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी फरशी स्टॉप येथील श्री देवनाथ महाराज पिठाधिश्वर आचार्य श्री जितेंद्रनाथ महाराज यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कुसुमताई लोमटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# जनसेवक दिवस म्हणून साजरा होणार

## लोकप्रिय आ. रवि राणांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम : स्वाभिमान कार्यालयात नियोजनाची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

लोकप्रिय आ. रवि राणा यांचा वाढदिवस जनसेवा दिवस म्हणुन २८ एप्रिल रोजी सकाळी १० ते ४ पर्यंत संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन अमरावती येथे विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा होणार आहे.




या निमित्ताने निःशुल्क भव्य रोग निदान शिबीरामध्ये कान, नाक, घसा, कॅन्सर, मेमोग्राफिक, बालरोग, अस्थीरोग व डेंटल शखक्रिया, सामान्य शस्त्रक्रिया, त्वचारोग, डोळ्यांची तपासणी, शखक्रिया व चष्मे वाटप, खीरोग निदान, लिवर, हृदयरोग, मेंदुरोग, किडनी, कर्णबधिरांना कर्णयंत्राचे वाटप व रुग्णांना निःशुल्क औषधीचे वाटप इत्यादीचा समावेश तसेच बेरोजगारांना लोटगाडी व कटला वाटप, विधवा, परितक्त्या भगिनींना शिलाई न मशिन वाटप, लहान मुलांना बॅट बॉल किट वे वाटप, भजन महिला मंडळांना भजन साहित्य वाटप आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

दरवर्षी बडनेरा मतदार संघाचे लोकप्रिय आ. रवि राणा यांचा वाढदिवस युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने जनसेवा दिवस म्हणुन साजरा व करण्यात येतो. युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या मार्गदर्शनात युवा स्वाभिमान पार्टीच्या राजापेठ येथील मुख्य कार्यालयात कार्यक्रमाच्या नियोजनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध कार्यक्र घेण्यासंदर्भात चर्चा झाली. वया चर्चेनंतर कार्यक्रमासाठी विविध समित्यांचे गठन सुद्धा करण्यात आले. यावेळी युवा स्वाभिमान पार्टी व शालीनीताई मेघे हॉस्पीटल अँड रिसर्च सेंटर, नागपुर द्वारा आयोजित निःशुल्क भव्य रोग निदान शिबीराचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८.०० ते २.०० या कालावधीमध्ये भव्यरक्तदान शिबीर सुद्धा आयोजीत केले आहे. प्रत्येक रक्तदात्यालाएक ब्लु टुथ व सन्मानचिन्ह दिल्या जाणार आहे. सर्वसामान्य जनतेला शासकिय योजनांचा लाभ जागेवरच मिळावा त्याकरिता विविध शासकिय योजनांचे शिबीर सुद्धा आयोजीत केले आहे. यामध्ये मोफत पी. आर कार्ड वाटप समावेश आहे. तसेच निःशुल्क भव्य रोग निदान शिबीरामध्ये कान, नाक, घसा, कॅन्सर, मेमोग्राफिक, बालरोग, अस्थीरोग वशस्त्रक्रिया, सामान्य शखक्रिया, त्वचारोग, डोळ्यांची तपासणी, शखक्रिया व चष्मे वाटप, खीरोग निदान, लिवर, हृदयरोग, मेंदुरोग, किडनी व निःशुल्क औषधीचे वाटप इत्यादीचा समावेश आहे. भजन महिला मंडळांना भजन साहित्य वाटप इ. कार्यक्रमांचा समावेश असल्याचे या बैठकीमध्ये ठरविण्यात आले. तसेच हे कार्यक्रम राबविण्याकरिता विविध समित्यांचे गठन सुद्धा करण्यात आले आहे. ज्यांना ज्यांना ज्या समितीमध्ये नाव द्यायचे असतील त्यांनी कृपया युवा स्वाभिमान पार्टीच्या मुख्य कार्यालयात द्यावे असे आवाहन युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे, या बैठकीमध्ये शहर अध्यक्ष संजय हिगासपुरे, सुमती ढोके, हरिश चरपे, सुखदेव तरडेजा, आशिष गावंडे, अवी काळे, अनुप अग्रवाल, विरेंद्र उपाध्याय, नाना सावरकर, अजय जयस्वाल, नितीन बोरेकर, विनोद गृहे, विलास वाङ्कर, डॉ. हरिराम भाडे, शयाम कथे पाटील, भुषण पाटणे, गणेशदास गायकवाड, बाळु इंगोले, तुषार दुधे, मिथिलेश तिवारी, राजु चुनकीकर, धनंजय लोणारे, लता अंबुलकर, माला खुरसुडे, रईसा परविन, महेश मुलचंदानी, अशोक पांडे, शंकर डोंगरे, हर्षल रेवणे, आनंद जयस्वाल, शोभा किटके, मंदा तायडे, गजानन सावंत, मक्सूद भाई, निता खडसे, राजु रॉय, अर्जुन दाते, अभिजीत भोयर, विनोद खडसे, सुनिल तरडेजा, मंगेश चव्हाण, सुशिला मोलके, सुरज मिश्रा, मनोहर मारोडकर, प्रविण अरक, मंगला जाधव, सुनिता राऊत, विजया घोडेस्वार व असंख्य युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# देशात चंद्रपूरचे तापमान सर्वाधिक

## राज्यात २२, २३ ला उष्णतेची लाट!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चंद्रपूर**

विदर्भात उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. गेल्या दोन दिवसांपासून चंद्रपूर जिल्ह्यात तापमानाचा पारा चांगलाच चढला आहे. सोमवारी ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्यानंतर रविवारी चंद्रपूर जिल्ह्याचे तापमान देशात सर्वाधिक नोंदवले गेले. रविवारी जिल्ह्याचे तापमान ४४.६ अंश सेल्सिअसवर पोहोचले. या हंगामातील हे सर्वोच्च तापमान ठरले आहे. तीव्र उन्हामुळे दुपारच्या सुमारास शहरातील रस्ते निर्मनुष्य होते.

एप्रिल महिन्यातच चंद्रपूर जिल्ह्यातील रहिवासी उष्णतेने त्रस्त झाले आहेत. रविवारी बुलढाणा वगळता विदर्भातील सर्वच जिल्ह्यांच्या तापमानाने चाळिशी ओलांडली. अकोला, अमरावती, ब्रह्मपुरी, नागपूर आणि वर्धाचे तापमान ४४ अंशापेक्षा अधिक नोंदवले गेले.

चंद्रपुरात सकाळपासूनच तीव्र उन्हामुळे उकाडा जाणवत होता. दिवसभर वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यामुळे नागरिक त्रस्त झाले. बाजारपेठेचा दिवस असूनही दुपारच्या सुमारास प्रमुख रस्त्यांवर शुकशुकाट होता. सुट्टीचा दिवस आणि कडक उन्हामुळे नागरिकांनी दुपारी घराबाहेर न पडणेच सुरक्षित मानले. यामुळे रस्त्यांवर मोजकीच वाहने दिसत होती.

**२२, २३ ला उष्णतेची लाट**

नागपूर प्रादेशिक हवामान खात्याच्या अंदाजानुसार २२ आणि २३ एप्रिलला जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. यामुळे नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश केवळ प्रचाराचा मुद्दा नसून, ती काळाची गरज

## यशदीप सागर डोंगरे याचा सातवा वाढदिवसातून झाडे लावण्याची व जगवण्याची सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

अमरावतीच्या महादेव खोरी परिसरात बागडे लेआउट सुधार समिती मधल्या प्रसिद्धी प्रमुख सागर डोंगरे यांच्या मुलाचा सातवा वाढदिवस जल्लोषात न साजरा करता साधा सुधा स्वरूपात झाडे लावून साजरा केला.



दिवसेंदिवस तापमान खूप जास्त प्रमाणात वाढत चालले आहे अनेकांना उष्माघात सुध्दा झाले आहे या तापमानामुळे घरातील कूलर सुद्धा काम करत नाही अश्या तापमान वाढीच्या वातावरणात घरातून बाहेर पडताना खूप काळजी तर घ्यावीच लागते पण कितीही आपण स्वतःच संरक्षण केलं तर उन्हाचे चटके लागतातच ,झाडे ही पृथ्वीवरील पर्यावरणाचा महत्त्वाचा घटक आहेत. ती फक्त ऑक्सिजनचा पुरवठा करत नाहीत, तर जीवसृष्टीचे संतुलन राखण्याचे काम करतात. झाडांमुळे आपण शुद्ध हवा, अन्न, आणि निवासस्थान मिळवतो. त्याशिवाय झाडे जमिनीचे धूप थांबवतात आणि जलचक्र संतुलित ठेवण्यास मदत करतात.

झाडांचे महत्त्व आपल्या जीवनात अमूल्य आहे. त्यामुळे आपण झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश आचरणात आणून निसर्गाचे रक्षण करण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे. आजच्या परिस्थितीत झाडांचे संवर्धन आणि त्यांची संख्या वाढवणे ही काळाची गरज आहे.म्हणून आम्ही आजच्या पासूनच वाढदिवसाच्या निमित्ताने झाडे लावा, झाडे जगवा उपक्रम सुरू केला आहे ही चळवळ प्रत्येकाने अंगीकारली पाहिजे. या सगळ्यामुळे झाडांचे समतोल राखला जाईल माझ्या वैयक्तिक पातळीवर मी झाडे लावण्यासाठी आणि ती जगवण्यासाठी प्रयत्नशील आहे. माझ्या घराच्या परिसरात मी दरवर्षी वृक्षारोपण करतो. माझ्या मित्रपरिवाराला आणि स्थानिक नागरिकांना याबाबत जागरूक करण्याचा प्रयत्न या वाढदिवसा निमित्ताने झाडे लावा झाडे जगवा उपक्रमातून सुरू केला आहे या वाढदिवसाच्या दिवशी झाडे लावण्याचा उपक्रमात सागर डोंगरे वैशाली डोंगरे, विराज डोंगरे,सुरेंद्र डोंगरे, बागडे ले आऊट सुधार समिती मधील अध्यक्ष विठ्ठल मरापे,सचिव सुमेध इंगळे, उपाध्यक्ष सुंदरलाल उईके,प्रदीप रंगारी,महेंद्र राऊत,अमोल गाठे,प्रदीप गायकवाड,किशोर पालेकर,यशोधरा पालेकर,प्रतीक मेश्राम, प्रांजल खडसे,मनोज गजभिये,उत्तम काळपांडे,राहुल मेश्राम,अमोल वानखळे,विनोद इंगळे,राहुल बोरकर,किशोर बोरकर, जितू माटे, उपस्थित राहून सगळ्यांनी झाड लावण्याच्या उपक्रमात सहभाग घेतला होता.

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात मायक्रोसॉफ्टचा ग्लोबल एआय बूट कॅम्प संपन्न

## अमरावतीत पहिल्यांदाच घडले मायक्रोसॉफ्टचे शिबीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालय येथे नुकताच अमरावती मधील मायक्रोसॉफ्ट कंपनीचा पहिला ग्लोबल एआय बूट कॅम्प (Global AI Bootcamp) शिबिर संपन्न झाले. हे शिबीर महाविद्यालयातील मायक्रोसॉफ्ट शिक्षण विद्यार्थी संघ यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आले. या ऐतिहासिक कार्यक्रमांतर्गत मध्य भारतातील विद्यार्थ्यांना व तंत्रज्ञानप्रेमींना AI, no-code AI, Networking, Technical Sessions आणि Live Demonstrations या विषयांवरील ज्ञान व अनुभव प्रदान करण्यात आले.




या शिबिराचे उद्घाटन मायक्रोसॉफ्टमध्ये सॉफ्टवेअर अभियंता असलेले मा. आदित्य सलाडी आणि मायक्रोसॉफ्ट तंत्रज्ञानातील तांत्रिक प्रमुख मा. वेंकट जे यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप जावंधिया, विद्यार्थी कल्याण विभागाचे डीन डॉ. सनप्रीत कौर नंदा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लॉर्निंग विभागाचे प्रमुख डॉ. झिशान खान, प्रा. प्रा. कृतिका छाजेडयांच्या उपस्थितीत पार पडले.शिबीराच्या पहिल्या सत्रामध्येआदित्य सलाडी यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या मूलतत्त्वांपासून त्याच्या व्यवहारिक अनुप्रयोगांपर्यंतचा विस्तृत आढावा दिला. त्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाच्या संधी आणि उद्योगातील नवकल्पनांचा उल्लेख करून स्पष्ट माहिती दिली.दुपारच्या दुसऱ्या सत्रात वेंकट जे यांनी नो-कोड AI या विषयावर सखोल माहिती सादर केली. या सत्रादरम्यान Azure -I Studio चा परिचय करून देत, कोडिंगशिवाय AI Models कसे तयार व अंमलात आणता येतात याचे प्रत्यक्ष उदाहरणे दिली गेली.स्पर्धात्मक -ख-संगणक अभियांत्रिकी क्विझ कार्यक्रमाचा एक आकर्षक भाग म्हणून आयोजित केलेल्या स्पर्धात्मक टींळ मध्ये वैयक्तिक तसेच गटांमध्ये प्रश्नांची स्पर्धा करण्यात आली. या स्पर्धेमुळे उपस्थितांच्या तांत्रिक व व्यावहारिक ज्ञानाचे उत्कृष्ट परीक्षण झाले.विविध सत्रांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या पैलूंवर सखोल चर्चा व प्रत्यक्ष प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना नव्या तंत्रज्ञानाची थेट ओळख करून दिली गेली.विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, तज्ञ आणि उद्योग प्रतिनिधी यांच्यातील संवादामुळे भविष्यकालीन कोलबरेशन च्या संधी निर्माण झाल्या.या शिबिराच्या यशस्वितेसाठी विद्यार्थी अमित कुमार यादव, करमवीरसिंह ओबेरॉय आणि ऐश्वर्या बारामसे व संपूर्ण टीम यांनी अथक प्रयत्न केले. आयोजकांनी विद्यार्थ्यांना नवीन संकल्पना, उद्योगातील प्रगत टेक्नोलॉजी चे ज्ञान आणि संवादाच्या अनमोल संधी प्रदान करून मध्य भारतातील तंत्रज्ञान समुदायाला जागतिक पातळीवर उभारण्यास मोलाची भूमिका बजावली.या शिबिरात विविध महाविद्यालयातील दोनशे पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले या शिबीरामुळे मध्य भारतातील विद्यार्थी, तंत्रज्ञानप्रेमी आणि -ख क्षेत्रातील तज्ञ यांना नवीन उंची गाठण्याची प्रेरणा मिळाली.

# गेल्या १९ वर्षापासून प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची सेवा

## तळेगाव दशासर येथील रामावत कुटुंबीयांचा सेवाभावी उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१धामणगाव रेल्वे,**

तहानलेल्यांची तृष्णा भागविण्याएवढा धर्म नाही. म्हणूनच सामजिक कार्याचे भान ठेऊन तालुक्यातील तळेगाव दशासर येथे गेल्या १९ वर्षापासून बस स्थानकावरील प्रवाशांना शुध्द थंड पिण्याचे पाणी केली जात आहे.येथील रामावत कुटुंबीयांच्या ूरर सेवाभावी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.




लांब वरून बरेचसे प्रवासी प्रवास करीत असतात. वीस रुपयाची पाण्याची बॉटल घेणे सर्वांना शक्य नसते . उन्हामळे लहान मोठे सर्वांना पाण्याची आवश्यकता असते,तेव्हा धगधगत्या उन्हात जलसेवा हा उपक्रम नित्यनेमाने दररोज रामावत कुंबीय निस्वार्थपणे हे आपले कार्य करीत आहे. त्यांचे हे कार्य समाजाला प्रेरणादायी आहे.या जल सेवेचे उद्घाटन ओम महाराज शर्मा यांचे हस्ते,ठाणेदार रामेश्वर धोंडगे,पंचायत समितिचे माजी सदस्य नरेंद्र रामावत यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारला (ता.२०) करण्यात आले. यावेळी गोविंद कांबली, विजय गुल्हाने,भारती चूटे,रवि चुटे, श्याम घाटे,राजू भिवरकर, भागचंद रामावत,पप्पू रामावत, डॉ. विनोद देशमुख,आनंद देशमुख,सुयश देशमुख,तनवीर खान,विकास भिवरकर,विनोद पाटमासे व आदी उपस्थित होते.

# अमरावती पोलीस आयुक्तालयाचा प्रतिबंधात्मक आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

शहरात सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ३७ (१) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. हा आदेश दि. १ मेपर्यंत अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत लागू राहील.



या आदेशानुसार, शस्त्रे, लाठ्या, तलवारी किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरली जाऊ शकतील अशा कोणत्याही वस्तू बाळगणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा ती फेकण्याची उपकरणे बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे, कोणताही दाहक किंवा स्फोटक पदार्थ घेऊन जाणे, व्यक्तींच्या किंवा मृतदेहांच्या प्रतिमांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक ठिकाणी घोषणा देणे, गाणी गाणे किंवा वाद्य वाजवणे, असभ्य हावभाव करणे किंवा सभ्यता आणि नीतिमत्तेविरुद्ध तसेच राज्याच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करतील अशा चित्र, चिन्हे, फलक किंवा इतर वस्तू तयार करणे, प्रदर्शित करणे किंवा प्रसारित करणे, यासाठी मनाई करण्यात आली आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरूद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३५ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, नागरिकांनी याची नोंद घ्यावी आणि शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# नॅशनल हेरॉल्ड घोटाळ्याच्या विरोधात भाजयुमोचं अमरावतीत तीव्र आंदोलन

## प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पार्टी कार्यालया समोर निदर्शने : राहुल गांधीची प्रेतयात्रा काढून केला निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २१ अमरावती**

नॅशनल हेरॉल्ड घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर कठोर कारवाईची मागणी करत भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशतर्फे अमरावती येथील काँग्रेस कमिटीच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले, विशेष म्हणजे या आंदोलनाच्या वेळी युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पिंपरी चिंचवड येथील रहिवासी श्री अनुप मोरे ते आवर्जून उपस्थित होतेदेशभरात सध्या नॅशनल हेरॉल्ड घोटाळा गाजत आहे, यासंदर्भात पीडीतर्फे राहुल गांधी यांना नोटीस सुद्धा बजावण्यात आलेली आहे तसेच याच प्रकरणांमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी व श्रीमती सोनिया गांधी हे जामिनावर बाहेर आहेया दोन्ही काँग्रेस नेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करून यांना कठोर शिक्षा द्यावी या मागणीसह संपूर्ण देशामध्ये भारतीय जनता युवा मोर्चा ने आंदोलनाची मालिका उभी केली आहे, महाराष्ट्रात सुद्धा पुणे संभाजीनगर नाशिक कोल्हापूर सांगली सातारा नांदेड लातूर सह अनेक जिल्ह्यांमध्ये आंदोलन करण्यात आलेले आहे यानुसार आज अमरावती येथे भारतीय जनता युवा मोर्चा ने तीव्र आंदोलन केले



यावेळी युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री श्री बादल कुलकर्णी, अमरावती शहर जिल्हाध्यक्ष श्री कौशिक अग्रवाल, ग्रामीण अध्यक्ष श्री अजिंक्य वानखडे, प्रदेश सचिव प्रणित सोनी, कार्यकारिणी सदस्य तुषार चौधरी, निलेश पवार, ग्रामीण महामंत्री करण धोटे,नितीन गुजर, शहर महामंत्री प्रवीण रुद्रकार, ऋषिकेश देशमुख, अखिलेश राठी,यश शर्मा, रोहित गुप्ता, गोपाल साहु, वंश गांवडे, अखिलेश खडेकार, राजेश बंसतणार, युवराज पवार, सौरभ रत्नपारखी, ऋषिकेश तेल्हार, अनिकेत वाजुरकर,सुमित गुल्हाने, शुमभ गोम, पवन जेशिकर, देवा जेशिकर, सहिल चौधरी, निरंजन दुबे, मनिष अडविकार ऋषिकेश चौबे, श्याम साहू, निरंजन दुबे, स्वराज ठाकरे, निखिल टेकाळे, गौरव मडगे, सागर माहुरे निवृत्ती, निवृत्ती सावरकर, शुभम सांगले, वैभव गायकी,सनी दुदवानी, आकाश अविटकर, श्रीपेश धानोरकर, तुषार अंगोरे, अलपेश जुनघरे, कुणाल गोरे, योगेश श्रीवास्तव, स्वप्निल बावरिया, वैभव बनकर, उमग मोगा, विजय उपाध्याय, राज नगरे, अनिकेत राजुरकर अनिकेत विश्वकर्मा,वैभव बेलसरे, महेश भारतीय अभिषेक जोशी ऋषिकेश चौबे. कार्तिक सामदेकर प्रफुल मानके,आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमरावती जिल्हा परिषद विश्रामगृहाचा भाजपच्या आंदोलनासाठी वापर

### खासदार बळवंत वानखडे व यशोमती ठाकूर यांनी केली कारवाईची मागणी



नॅशनल हेरॉल्डच्या घोटाळा प्रकरणी काँग्रेस पक्षाच्या विरुद्ध भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुज मोरे यांच्या नेतृत्वाखाली भाजपने काँग्रेस भवनावर आंदोलन केलं, मात्र यामध्ये अमरावती जिल्हा परिषदेचे मालटेकडी जवळील विश्रामगृहाचा गैरवापर भाजपने केला, या ठिकाणी काँग्रेस व राहुल गांधी यांची प्रतीकात्मक तिरडी या ठिकाणी तयार करत भाजपचे झेंडे बॅनर लावण्यात आल्याचा आरोप काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर व काँग्रेस खासदार बळवंत वानखडे यांनी केला.यावेळी यशोमती ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांनी प्रतिक्रिया देत जिल्हा परिषद अधिकारी यांच्यावर कारवाईची मागणी करतं भाजपा कार्यकर्त्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली,अधिकाऱ्याने एक गोष्ट समजून घ्यावे अजून लोकशाही जिवंत आहे सत्तेतील लोक शासनाचा गैरवापर करत असतील तर तर हे आम्ही खपून घेणार नाही.. तर शासकीय यंत्रणेचा वापर जर आंदोलनासाठी होत असेल तर चुकीचा आहे तर शासकीय इमारतीचा आधार घेऊन या यंत्रणेचा गैरवापर केला.त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजे,सत्ता आहे म्हणून अधिकारी हाताखालची बाहुली बनवत आहे ज्याअधिकाऱ्यांनी सहकार्य केलं त्यांच्यावर गुन्हे दाखल करा अशी मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी केली.

## नखगळतीचे रुग्ण वाढतेच! शेगाव तालुक्यात संयुक्त संचालकांची भेट, केंद्राचे पथकही येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१बुलढाणा**

जिल्ह्याच्या शेगाव तालुक्यात केसगळती व टक्कल आजाराची दहशत कायम आहे. चार महिन्यांनतरही भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचा (आयसीएमआर) अहवाल लालफीतशाहीतच अडकला आहे. यामुळे बाधित गावे आणि रुग्णांतील भीती कायम आहे.या पाठोपाठ शेगाव तालुक्यात आता नखगळतीचे संकट उभे ठाकले आहे. ग्रामस्थांची नखें कमकुवत होऊन गळून पडत आहे. बाधित गावांत जिल्हा आरोग्य विभागातर्फे सर्वेक्षणवजा पाहणी करण्यात येत आहे. काल रविवार, २० एप्रिलअखेर रुग्णसंख्या ६० च्या घरात पोहोचली आहे. पहिल्या दिवशी १७ एप्रिलला रोजी करण्यात आलेल्या सर्वेक्षणाअंती शेगाव तालुक्यातील चार गावात नखगळतीचे तब्बल ३७ रुग्ण आढळून आले होते. यातील बव्हंशी रुग्ण हे केसगळती व टक्कलचे रुग्ण असल्याचे आढळून आले.



१८ तारखेला आरोग्य यंत्रणांनी केलेल्या पाहणीत नखगळतीचे आणखी तीन रुग्ण आढळून आले होते. त्यामुळे रुग्णसंख्या ४० वर गेली. १९ ला देखील सर्वेक्षण करण्यात आले आहे. या पाहणीत आणखी १४ रुग्ण आढळून आले. २० तारखेला आणखी ३ रुग्ण आढळल्याने नखगळतीची रुग्णसंख्या ६० च्या घरात गेली आहे. शेगावमधील कठोरा, मच्छिन्द्रखेड, बोन्डगाव, घुई, कालवड या गावात नखगळतीची तीव्रता जास्त आहे. यात वाढच होत असल्याचे चित्र आहे. परिणामी शेगाव, खामगाव आणि शेगाव तालुक्यातील टक्कल बाधित सोळाएक गावात आता नखगळतीच्या विचित्र आजाराची भीती पसरली आहे.बोंडगावसह परिसरातील गावात सुरुवातीला केसगळती आणि आता नागरिकांच्या नखगळतीने खळबळ उडाली आहे. मागील पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या हा प्रकार आरोग्य विभागाला अद्यापही थांबविता आलेले नाही. आज आरोग्य विभागाच्या पुणे येथील जॉईन्ट डायरेक्टर डॉ. बबिता कमलापूरकर यांनी या गावात भेट दिली. यावेळी नखगळती झालेल्या बाधित रुग्णांशी त्यांनी चर्चा केली. महत्त्वाचे म्हणजे तीन महिन्यांपूर्वी केसगळतीमुळे हे गाव प्रकाशझोतात आले होते. दरम्यान, दिल्ली येथील आयसीएमआरच्या पथकाने या गावात पोहोचून केस, नख, अन्नधान्य, पाणी रक्तांचे नमुने घेतले होते. मात्र त्याचा अहवाल प्राप्त झाला नसल्याने आचार्य व्यक्त होत असतानाच आता नख गळतीचे रुग्ण समोर येत असल्याने आरोग्य प्रशासन खळबळून जागे झाले आहे. नखगळतीबाबत तपासण्या सुरू करण्यात आल्या आहेत. उद्या मंगळवारी गावांमध्ये दिल्लीचे आरोग्य पथक दाखल होणार आहेत. गावकऱ्यांना घाबरून जाण्याचे कारण नाही. लवकरच निष्कर्ष काढून उपाययोजना केल्या जातील अशी माहिती डॉ. बबीता कमलापूरकर यांनी दिली.

**संयुक्त संचालकांची भेट**

आज सोमवारी पुणे येथील विशेष आरोग्य चमू शेगाव तालुक्यात दाखल झाली. बोंडगाव, कठोरा या गावांना चमुने भेट दिली. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संयुक्त संचालक ( जॉईंट डायरेक्टर) डॉ. बबिता कमलापूरकर यांनी आज बाधित रुग्णांशी चर्चा करून माहिती जाणून घेतली. सोबत आरोग्य विभागाचे जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, तालुका आरोग्य अधिकारी, आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी होते.


सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा M-8605948853


## एटीएम नियम बदलणार १ मेपासून पैसे काढणे महागणार

### बॅलन्स चेक करण्यासही लागणार चार्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

देशभरात डिजिटल व्यवहार वाढले आहेत, मात्र एटीएम मशिनमधून रोकड काढण्यासाठीही ग्राहकांची रांग पाहायला मिळते. त्यामुळे, देशात एटीएम युजर्सची संख्या देखील कोट्यवधींच्या घरात आहे. राष्ट्रीय बँकांसह आता सहकारी आणि पतपेढी बँकांनी देखील एटीएम सेवा सुरू केल्याने आता गाव तिथं एटीएम पाहायला मिळत आहे. बँकेत जाऊन रांगेत उभे राहून पैसे काढण्यापेक्षा हवे तेवढे आणि गरज असेल तेव्हा बँकेतून पैसे काढण्यासाठी एटीएम ही उत्तम सेवा आहे. आता, याच एटीएम ग्राहकांसाठी १ मे पासून नियमांत बदल होत आहे. म्हणजेच, एटीएम चार्जमध्ये यापुढे बदल होत आहे.




आरबीआयकडून नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) च्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आल्यानंतर आता दुसऱ्या बँकेच्या एटीएम मशिनमधून पैसे काढणे महागणार आहे. १ मे पासून हा बदल लागू होणार आहे. त्यानुसार, ठरवून दिलेल्या लिमिटनंतर दुसऱ्या बँकेच्या एटीएममधून पैसे काढल्यास आता १७ ऐवजी १९ रुपये चार्ज लागणार आहे. तसेच, बॅलेन्स चेक करण्याचा चार्ज देखील ७ रुपयांवरुन ९ रुपयांवर पोहोचला आहे. दरम्यान, सध्या बँकांकडून दुसऱ्या बँकेतील एटीएममधून पैसे काढण्यासाठी मेट्रो शहरात ५ आणि नॉन मेट्रो शहरात ३ व्यवहार मोफत दिले जात आहेत. मात्र, तीनपेक्षा जास्त व्यवहारांवर चार्ज लावण्यात येतो.

एटीएम चार्ज वाढवल्याने एटीएम नेटवर्क ऑपरेटर आणि व्हाईट लेबल एटीएम कंपन्यांकडून इंटरचेंज फीस वाढविण्याची मागणी होत आहे. सध्या, त्याचे मेन्टेनन्स आणि ऑपरेशन खर्च पूर्वीच्या तुलनेत वाढलेले आहेत. त्यातच, नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून ही मागणी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियासमोर ठेवण्यात आली आहे. त्यास, आरबीआयने ग्रीन सिग्नल दिला आहे.

**डिजिटल व्यवहार करणे फायदेशीर**

एटीएम व्यवहारांवरील चार्ज वाढवल्याने आता त्या बँकांवर अधिक परिणाण होणार आहे, ज्या एटीएम सर्व्हिससाठी दुसऱ्या बँकांवर अवलंबून आहेत. ग्राहकांना आता नॉन होम बँक एमटीएमधून पैसे काढण्यासाठी किंवा पुन्हा बॅलेन्स चेक करण्यासाठी अधिकचा चार्ज द्यावा लागणार आहे. दरम्यान, एटीएम सेवा दरात झालेली वाढ लक्षात घेता ग्राहकांनी आता ज्या बँकांचे एटीएम वापरतो, त्याच बँकांच्या एटीएममधून पैसे काढावे किंवा युपीआय पेमेंटच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार केल्यास एटीएम चार्जपासून सुटका करून घेता येईल.

## शुक्रवारपासून ग्रीष्मकालीन क्रीडा प्रशिक्षण शिबीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे ग्रीष्मकालीन क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. २५ एप्रिल ते दि. ८ मे कालावधीत जिल्हा क्रीडा संकुलासह विविध ठिकाणी होणार आहे.

या प्रशिक्षण शिबिरात धनुर्विद्या, व्हॉलीबॉल, सॉफ्टबॉल, बॅडमिंटन, तलवारबाजी, बास्केटबॉल, स्क्वॅश, नेटबॉल, शुटींगबॉल, मल्लखांब, टेबल टेनिस, थ्रोबॉल, स्केटींग, कुडो, बॉक्सिंग या १४ प्रकारच्या खेळांचे प्रशिक्षण अनुभवी प्रशिक्षकांद्वारे दिले जाणार आहे. खेळाडूंनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे.

शिबिरात शारीरिक तंदुरुस्ती, खेळाचे तंत्र आणि कौशल्ये, तसेच खेळाडूंचा सर्वांगीण विकास यावर लक्ष केंद्रित केले जाईल. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी प्रफुल्ल डांगे ९९२३००८४११, राहुल निवडंगे ७७७४००१५७९, स्वप्नील चांदेकर ९७६७०००९४९, रितेश अनंतवार ८६६९०८४१४२ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वऱ्हाडी नाचण्यात गुंग अन् नवरदेवाच्या बग्गीचे ब्रेक झाले फेल अनियंत्रित बग्गी वरातीत शिरली, महिलेचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यात सध्या लग्नसराईचे दिवस सुरू असून तापमानाचा पार चांगलाच चढला आहे. यामुळे बहुतांश लग्नसमारंभ हे रात्रीच्या मुहूर्तावरच संपन्न होत आहेत. अशाच एका लग्न सोहळ्यात एक दुर्दैवी घटना घडली. वरातीदरम्यान नवरदेवाच्या बग्गीचे ब्रेक फेल झाले. यामुळे अनियंत्रित झालेली बग्गी वरातीत शिरली. बगीच्या धडकेत वरातीत सहभागी असलेल्या वरपक्षातील एका महिलेचा मृत्यू, तर एक महिला गंभीर जखमी झाल्याची घटना सालेकसा तालुक्यातील लोहारा येथे रविवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली.



गोपिका भाऊलाल ढोमणे (७०, रा. गोंडमोहाडी, ता. तिरोडा, जि. गोंदिया) असे मृत महिलेचे, तर कांताबाई टिकाराम भंडारी (६०, रा. घोटी, ता. गोरेगांव, जि. गोंदिया) असे या घटनेतील जखमी महिलेचे नाव आहे. जखमी महिलेला सालेकसा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सविस्तर वृत्त असे की, सालेकसा तालुक्यातील लोहारा येथे मुकेश सहारे यांच्या दोन मुलींचे रविवार, २० एप्रिलला लग्न होते. त्यांच्या निवासस्थानी रात्रीच्या सुमारास आयोजित समारंभासाठी दोन नवरदेव लोहारा या गावी आले होते. त्यात एक गोरेगाव तालुक्यातील झांझिया येथील व दुसरा नवरदेव तिरोडा तालुक्यातील गोंडमोहाडी येथील होता.